साहित्य प्रतिष्ठान

नोंदणी क्र.: महा/३११७/१०/ठाणे

# शतकोत्सव

शतकोत्सव

# नेटअक्षरी

## नेटाक्षरी

अंक क्र. १००

आठवांचा...
मैत्रीचा...
संवादाचा..!

*****

नेटाक्षरीचे माजी संपादक

स्वर्गीय श्री. घनश्याम अच्युत पौटभरे

उर्फ़

अहं ब्रह्मास्मि

यांच्या स्मृतीस अर्पण

*****



स्व. अहं ब्रह्मास्मि

पुणे

नेटाक्षरी

अंक क्र. १००


माऊली मराठी दिगंतरी



# संपादक मंडळ

# ओळख संपादकांची



स्व. अहं ब्रह्मास्मि

पुणे



रेणु खटावकर

अमेरिका



सोनाली घाटपांडे

पुणे



सुरुची नाईक

नागपूर



भारती सरमळकर

मुंबई



स्वप्ना कोल्हे

नाशिक

# ओळख संपादकांची



नाम गुम जायेगा
ठाणे



शशिकांत रणवरे
ठाणे



सचिन काकडे
मुंबई



आनंद माने
सोलापूर



सारंग भणगे
पुणे



# ओळख नेटाक्षरीची...

netakshare@gmail.com
साहित्य प्रतिष्ठान

## ओळख नेटाक्षरीची

**नेटाक्षरी ह्या मराठी ई नियतकालिकाचा हा शंभरावा अंक.** जगभर विखुरलेल्या मराठी भाषिकांपर्यंत मराठी साहित्य इंटरनेटचा वापर करुन नेटाने पोहोचावं ह्या उद्देशाने नेटाक्षरीची पायाभरणी झाली. आपण पाहतो की अनेकदा आपल्याला येणाऱ्या इमेल मध्ये सुंदर फोटो अथवा इंग्रजी, हिंदी भाषातले विनोद, किस्से असतात. आपल्याला ह्या सर्वांची इतकी सवय होऊन गेलेली असते की मराठी अक्षर देखील आपल्या दृष्टीस पडत नाही ह्याचं आपल्यास काहीही वाटत नाही. पण हे सारं घडत होतं नेटाक्षरी प्रकाशनपुर्वकाळात. आज जर तुम्ही पहाल तर प्रत्येक मराठी माणसाच्या इनबॉक्स मधे नेटाक्षरीचा सबस्क्राईबर असेल तर सारे अंक त्याच्या कंप्युटरवर तुम्हाला आढळतीलच. अतिशयोक्ती नाही पण आज अनेक मराठी लोक एकमेंकांना विचारतात, नेटाक्षरी वाचलं का? नसेल वाचलं तर लगेच फॉरवर्ड करतात.

**नेटाक्षरी** हे आहे मराठी कवितांना वाहिलेलं ई साप्ताहिक. दर आठवडयाला प्रकाशित होणारं. दर अंकामधे एक ‘खास विषय’ असतो व त्या विषयानुरुप सात ते पंधरा कविता असतात. तसेच प्रत्येक अंकास एक अतिथी संपादकही असतो. हा अतिथी संपादक कधी समाजातलं एखादं प्रसिध्द व्यक्तीमत्व असतं तर कधी कुणी महाविद्यालयीन युवक/युवती देखील. तसं पहायला गेलं तर नेटाक्षरीचे अतिथी संपादक हे ‘स्टार’ असतात. कारण त्या संबंधित अंकाद्वारे त्या व्यक्तीमत्वाची, त्याच्या विचारांची आणि त्यांच्यातल्या अलौकिक गुणांची ओळख जगाला करुन दिली जाते. काही हटके करणारी मंडळी. अतिथी संपादकाचे अनुभव वाचून सामान्य माणसास देखील प्रेरणा मिळते. ही प्रेरणा कधी कथा, कविता लिहायची असते तर कधी आयुष्यात सकारात्मकतेने वाटचाल करण्याचीही. विशेष म्हणजे अतिथी संपादकाला वयाची अट नाही. अतिथी संपादक म्हणुन नेटाक्षरीला १८ वर्षाची कवयित्री चैताली म्हापसेकर, मुंबई ते ८४ वर्षाचे स्वातंत्र्यसैनिक वसंत हुदलीकर, नाशिक लाभले आहेत. ह्यावरुनच तुमच्या लक्षात येईल की सर्व वयोगटाने नेटाक्षरीला आपलंस केलंय आणि नेटाक्षरीने देखील सर्व वयोगटांना.

netakshare@gmail.com

साहित्य प्रतिष्ठान

कवींच्या वाढदिवस, जयंती, पुण्यतिथी किंवा विशेष पुरस्कारांच्या निमित्ताने नेटाक्षरीचे विशेषांकही प्रकाशित होत असतात। उदा. विं.दा. करंदीकर, कुसुमाग्रज, अरुण काळे, वा.वा. पाटणकर, इंदिरा संत, ग्रेस, रविंद्रनाथ टागोर, नारायण सुर्वे, इत्यादी.

ना.धो. महानोर ह्यांना जेव्हा २००९ साली जनस्थान पुरस्कार मिळाला तेव्हा नेटाक्षरीने त्यांच्यावर विशेषांक काढला व त्याच्यावर महानोरांची व डॉ. जब्बार पटेलांची स्वाक्षरी देखील घेतली होती. अंक पाहून व नेटाक्षरी विषयीची माहिती ऐकून त्यांना अतिशय कौतुक वाटले व लगेच खुद्द जब्बार पटेलांनी आपला ईमेल अॅड्रेस नेटाक्षरीला सबस्क्रायबर म्हणुन दिला. जुन्या प्रथितयश कवींवर विशेषांक काढून नेटाक्षरीने आपली नाळ आपल्या जुन्या साहित्य संस्कृतीशी जोडलेली आहे हे दाखवून दिलेय. तसेच नवोदित कवींनाही नेटाक्षरी प्रकाशझोत देतच असते. उदा. धनश्याम पोटभरे उर्फ अहं ब्रम्हास्मि ह्या नेटाक्षरीच्या माजी दिवंगत संपादकांना श्रध्दांजलीचा नेटाक्षरीने विशेषांक काढला होता. त्यात त्यांच्या कविता होत्या ज्या वाचुन समाजातील सर्व स्तरांतुन खुप चांगले अभिप्राय त्यांच्या कवितेला मिळाले.

मराठी माणसाच्या मनातले दिनविशेष लक्षात घेऊनही नेटाक्षरी विशेषांक निघत असतात. उदा. आषाढी, शिवजंयती, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, आंतरराष्ट्रीय महिला दिन, वॅलेंटाईन डे, गणेश चतुर्थी वगैरे विषयांवर अत्यंत सुंदर आणि समयोचित अंक नेटाक्षरीने दिले आहेत. ह्यामुळे नेटाक्षरी अधिक लोकाभिमुख झालीय. कारण, जसजसा काळ बदलतो तसतसं लोकांचे विचार, त्यांच्या भावना, अपेक्षा बदलतात आणि कविमन हे अधिक संवेदनशील असल्या कारणाने समाज बदलाची प्रमुख दखल साहित्यात दिसत असते। मग ते कथात असो वा कवितांत. त्यामुळे नेटाक्षरी हे वैचारीक बदलाच्या प्रक्रियेचा पुरावा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. MTV च्या पिढीतलं मराठी काव्य तुम्हाला नेटाक्षरीत दिसेल तसं संत आणि पंत काव्यही. त्यामुळे नेटाक्षरीचे ‘एक कटिंग चाय’, ‘रिकामी फ्रेम’, ‘पुरानी जीन्स’ असे विविध कूल हटके विषय असणारे अंक वाचकांना आवडले आणि ‘लोकमान्य’, ‘मीरा’, ‘विठ्ठल’अशा अंकाचंही जोरदार स्वागत झालं.

netaksharee@gmail.com

कारण, आमचा विश्वास आहे की जरी मराठी माणूस नोकरीसाठी डोक्याने इंग्रजी वापरतो तरी मनातून मात्र तो मराठीच विचार करतो. हृदयाने तो मराठी आहे. सांगायला आनंद वाटतो की नेटाक्षरीसारखी अनेक ई-मॅगझिन्स आहेत. ढिनच्याक, नेटभेट, वगैरे आणि नेट नियतकालिकांची ही चळवळ येणाऱ्या काळात एक महाप्रवाह होणार आहे. प्रयोगशील नेटाक्षरीकडे अजून खुप साऱ्या योजना आहेत. यथावकाश त्या मराठी साहित्यात मोलाची भर घालत राहतील.

**टीम नेटाक्षरी**



# सर्व संपादकांचे मनोगत
# व
# काही निवडक कविता....

# पालखीचा भोई......

कुणीतरी.. कुठेतरी.. काहीतरी.. लिहीत असतं... कुणी स्वतःसाठी लिहीतं, कुणी तिच्यासाठी लिहीतं कुणी लिहीण्यासाठी लिहीतं, कुणी वाहण्यासाठी लिहीतं आणि कुणी वाहत जातं लिहता लिहता दर्जेदार, मुल्यवान किंवा तत्सम काही गोष्टींचा विचार करतं, आणि लिहायचं थांबवतं कुणी.. वडापावला चटणी पुसुन उरलेल्या कागदावरही लिहुन जातो कुणी कलंदर, आयुष्याचे गीतासार कुणीतरी.. कुठेतरी.. काहीतरी.. वाचत असतं आपल्या आयुष्याचे संदर्भ जुळतात का? पाहत असतं जुळलेच कधी तर वाजते टाळी किंवा शिवीसुद्धा निघते आणि पुढे पुढे सरकत जाते वाचणा-याची ओळ लिहणा-याच्या ओळीपर्यन्त वाचणारा येऊन थांबेल तेंव्हा लिहीणा-याचा वाचणा-याशी होईल खराखुरा मेळ याच साठी सुरु आहे लिहीत्या हाताचा प्रवास आणि त्याचसाठी केला नेटाक्षरी चा अट्टाहास.

नेटाक्षरी चा प्रवास सुरु आहे
हा प्रवास थांबणार नाही,
खांदेपालट होत राहील,
नवनवे भोई मराठीच्या या नव्या पालखीस
येणा-या काळात जगभर मिरवत राहतील
मराठीच्या या पालखीला सर्वप्रथम उचलण्याचा मान मला
मिळाला या बद्दल मी खरोखरच आजन्म अभिमानाने
सर्वत्र सांगत राहीन.

कविता म्हणजे काय? किंवा तिची तांत्रिक माहीती
काय? अशा प्रश्नांच्या जाळ्यात न अडकता,
ज्या कविता माझ्या मनाला भिडल्या त्यांना
निवडुन अंकामध्ये मांडणे हे इतकेच मला
जमले.




**आनंद माने**
सोलापूर



नेटअक्षरी
अंक क्र.
१००


सर्वात पहिला अंक
------
२४-११-२००८

आकाशच्या **तु दिलेली शपथ** या कवितेतील अगतिकता ब-याच परिस्थितींची प्रतिकात्मक संवेदना होती

प्राजक्त ची **फ़ाटकी डायरी** असेल किंवा अविनाश कुलकर्णींची भांडवलशाही च्या विरोधातील **कंडोम** कविता या कवितातील प्रतिकांचा, उपमांचा वापर फ़क्त एका कविलाच जमेलआणि **आत्मशोध** या माझ्या शेवटच्या अंकातील आल्हाद ची कविता

**जेंव्हा धर्म नव्हता तेंव्हा माणूस अधर्माने काय वागत होता ?.. एवढेच असेल फ़क्त दंगली तेंव्हा होत नसतील**

या सर्व कविता या जश्या या कविंच्या आहेत तसेच त्या वाचणा-या वाचकांच्या आहेत.

या उत्सव-सोहळ्यात सहभागी होणा-या प्रत्येकास शुभेच्छा !




**आनंद माने**

सोलापूर

# तू दिलेली शपथ

तुझ्या त्या असाध्य आजारात
मी पण मरत होतो तुझ्या बरोबरच
कणा कणाने ... क्षणा क्षणाने
तेंव्हाच ठरवलं होतं..
ताजमहाल बांधून दिखावा करण्यापेक्षा
सरळ तुझ्या मागेच चालत जावं
पलीकडच्या आकाशात
पण अगदी शेवटच्या क्षणी
तू दिलेली शपथ 'माझ्यासाठी जग'
आणि निघून गेलीस... एकटीच ..
तसा मी अजून जीवंत आहे गं
पण काय होतं माहीतेय
तुझ्या शिवाय इथे जगता येत नाही
अन तुझ्या शपथे साठी मरताही येत नाही

हरवलेले आकाश
**आकाश बिरारी**
लंडन

# कंडोम

भांडवलशाही खऱ्या अर्थाने रुजवलीत तुम्ही मालक
आता या देशावर तुमचेच राज्य चालू झाले मालक
भाकरीसाठी लढायचा अधिकार काढून घेतलात मालक
नोटा चारून संप फ़ोडण्यात तरबेज झालात तुम्ही मालक
मजुराचे रक्त खुप स्वस्त दरात मिळते या देशात मालक
५-५० रुपये थोबाडावर फ़ेकून ८ तास शोषायला चटावलात तुम्ही मालक
देशातल्या राज्यकर्त्यांचे खरे रंग उमगलेत आम्हां मालक
निळे, तिरंगी, भगवे साऱ्यांचा एकच रंग - उमगले आम्हां मालक
भांडवलशाहीत जातीव्यवस्था चांगलीच राबवलीत मालक
कंत्राटी कामगार नांवाची नवीन जात निर्माण केलीत मालक
कंत्राटी कामगार , पण कच्ची बच्ची आहेत आम्हाला मालक
वापरा, काम झाले की फ़ेकून द्या - असं करायला कंडोम नाही
कामगार आहोत आम्ही मालक

अविनाश कुलकर्णी
पुणे

# फ़ाटकी डायरी


खिळखिळ्या झालेल्या सुटया डायरीच्या पानांना
क्रमवार लावणं अवघड नव्हतं तसं...
पडले होते ज्यावर
कट्टयावरच्या सिगारेटचे उष्टे थोटूक ते सर्वात आधी
ओली पानं त्यानंतर मित्रांसोबत पावसातल्या हैदोसाची
ज्यावर नक्षीकाम करून चांगलं अक्षर काढण्याचा प्रयत्न आहे
ती पानं 'ती'ला पहिल्यांदा पाहिल्या वरची नंतर
बराच वेळ नंतरची तारिख शोधावी लागेल.....
मध्यंतरी वेळच नव्हता लिहिण्याचा.....
चुरगाळलेली...
अर्धवट फ़ाडलेली..
गझल अर्धवट लिहुन सोडलेली पानं..
.
सर्वात शेवटी......
खिळखिळ्या झालेल्या सुटया डायरीच्या पानांना
क्रमवार लावणं अवघड नव्हतं तसं...

**प्राजक्त देशमुख**
नाशिक

# जेंव्हा धर्म नव्हता तेंव्हा

जेंव्हा धर्म नव्हता तेंव्हा
माणूस अधर्माने काय वागत होता ?
नशा धर्माची नसतानाही
असभ्य काय तो भासत होता ?
एवढेच असेल फ़क्त
दंगली तेंव्हा होत नसतील
संशयाच्या द्वेषाच्या भिंती
अस्तित्वातच नसतील
त्यावेळी केवळ माणूस माणसास
ओळखत असेल
धर्मापेक्षाही माणूस तेंव्हा
महत्वाचा असेल
त्यावेळी माणसाची ओळख
फ़क्त माणूसच असेल
माणूस फ़क्त माणूस
फ़क्त माणूस फ़क्त माणूस असेल

आल्हाद काशीकर
अमरावती







संपादक मंडळ




Netअक्षरी
लखलख चंदेरी...




हास्य Netअक्षरी




Netअक्षरी
'सांध्यपर्व'

# नॉस्टॅल्जिक...

"**नेटाक्षरी**" तस पाहिल तर इंटरनेटवर मेलद्वारे सर्क्युलेट होणार एक ई-मॅगझिन.. खास असं काही नाही, त्यात काय तशी भरपूर आहेत की मासिकं, साप्ताहीकं किंवा अनियतकालिक." माझी एक सहकारी मला सांगत होती. थोडसं नॉस्टाल्जिक व्हायला झालं आणि आठवली नेटाक्षरीची सुरुवात. अचानक सकाळी सकाळी एक फोन वाजला, आपण कवितांचं साप्ताहिक सुरु करतोय ........... का?? कसं ?? कधीपासुन ?? कविता कुठून आणायच्या विचारायला फुरसतही नाही मिळली.

आणि प्रवासाला सुरुवात झाली. कधी पायवाटा, कधी रस्ते, कधी बोटीतल्या सफरी तर कधी आकाशातल्या उंच भरा-या घेऊन आमचं 'नेटा' आज १००व्या पायरीवर येऊन पोचलंय.

मागे वळून पहाताना आठवतो सुरुवातीच्या अंकांना मिळालेला सपोर्ट, काही कौतुकाचे बोल, शाबासकी तर थोडीशी टिकाही. सुरुवातीला ४ संपादकांनी केलेला अंक हळूहळू स्वतंत्रपणे एकेकाचा बनत गेला. डिझाईनर, फोटोग्राफर, कवी आणि मुख्य म्हणजे आमचे लाखो वाचक असे लोक एकत्र येऊन कारवां बनता गया.



सोनाली घाटपांडे
पुणे

अंक क्र. १००

एकूण संपादक ११

प्रयोगशीलता आणि नाविन्याची ओढ ही दोन मला नेटाक्षरीकडुन मिळालेली गिफ्ट आहेत असं मी मानते. प्रत्येक अंक बनवताना काही ना काही शिकायला मिळालं, कधी नवं डिझाईन तर कधी कविता सिलेक्ट करताना एखादी कविता मनात घर करुन जायची. नेटाक्षरी हा एक अंक दिसत असला तरी त्यामागे अनेक लोकांचे कष्ट असतात, प्रेरणा असते. अगदी शाळकरी मुलांपासून मोठया साहित्यिकांपर्यंत इथे वाचक आहेत पण त्यांना धन्यवाद देउन त्यांच्या ऋणातून मुक्त होणे जमणारे नाही कारण हे लोक कायमस्वरूपी सोबत हवे आहेत.

मराठी भाषेला नोबेल मिळवून द्यायचं, मराठी भाषेचं एक वेगळ स्थान निर्माण करायच या एकाच ध्येयानं पुढे वाटचाल करणारे आम्ही **'तयाचा वेलू गेला गगनावरी'** ज्ञानेश्वरांच्या ऑवीतील या कडव्याप्रमाणे नेटाक्षरीचा हा वेलू नक्की पुढे पुढे नेऊ याची मला खात्री आहे.

नेटाक्षरीचे आधीचे अंक वाचण्यासाठी तुम्ही **www.esahity.com** ही वेबसाईट नक्की पहा.

नेटाक्षरीच्या अंकांमधील काही लक्षात राहिलेल्या खास कविता.



सोनाली घाटपांडे
पुणे

# बाहुली

होती कोणी सान बाहुली
मात-पित्याची प्यारी छकूली
निजण्यापूर्वी चुंबीन माथा
तोवरी पित्यास आराम कैसा ?

शाळेच्या रस्त्यावर चलता
एक दुकानी मनी भरला
होता सुंदर मौक्तिक कंठा
अस्सलहूनही नक्कल सुबकसा

आई म्हणाली शिघ्र करोनी
देई माझ्या इवल्या काजा
पैसे सत्वर देईन बेटा
घेऊन ये तो सुरेख कंठा

बक्षिस मिळता काम करोनी
किती हुरळली, किती खिदळली
ज्याला त्याला दाखवी मिरवत
मिळकत आपुली कष्टार्जित ती

रोज पित्याने रात्री यावे
माथा चुंबून एक पुसावे
प्रेम मला तू करसी जर
तर हार मला तव दे ना राणी

तितुके सोडून काही बोला
पप्पा मजला इतुके बक्षा
बाहुली, खेळणी अथवा काही
कंठा सोडून देईन जगही

असे सरकले कितीक दिन
मग एक दिनी तिज विचार आला
पप्पा माझे निजप्रेमाचे
देईन कंठा प्रिय जर त्यांना

पिता रात्री जव भेटीस आला
पप्पा घ्या हा हार तुम्हाला
माथा चुंबून बापाने मग
मखमली सुंदर बटवा दिधला

सुरेख अस्सल मौक्तिक कंठा
बटव्यांमध्ये होता दडला
आ नंदाने स्वर्ग ठेंगणा
गळा मिठीचा मधुर सोहळा

अस्सल जीवनी आम्हादेखील
देव मागतो प्रिय इवलेसे
लोभ सरो लव भौतिकतेचा
नकळे खजिना काय योजला??

**प्रभा प्रभुदेसाई**
चेन्नई

# कृष्णामाई

कृष्णामाई मनास मोही,
स्तुतीस्तवन तुझे ।
गणेश करतो श्रीगणेशा
लिहूनी कवन तुझे ।।१।।

अगाध महिमा ऐसा तुझा गे,
अजोड ती महती ।
स्वयं गणेशा , रामदासांची
लिहीतो ही आरती ।।२।।

नयनांमध्ये साठवली मी,
मूर्त तुझी देखणी ।
कुरूकुरू कोरे सुबक अक्षरे,
गणेशाची लेखणी ।।३।।

गातो मंगल तुझी आरती,
आणि यशोगाथा ।
ढ़ेवगणांच्या चरणी ठेवी,
उपेंद्र निजमाथा ।।४।।

**उपेंद्र चिंचोरे**
पुणे

# मुखवटा

का कुणास ठाऊक ?
काही केल्या सापडतच नाहीय
हम्म्म्म ............
इथेच ठेवते काढून नेहमी .... माझ्या उश्याशी रात्रभर
निदान रात्रीतरी
स्वतःशीच थोड्या गप्पा मारता येतील म्हणून
स्वतःला नीटस बघता येईल म्हणून
मग ना निवांत झोप लागते
पण आता उजाडलयं
कशी पडू घराबाहेर त्याच्याशिवाय ?
सवय झालीय म्हणा न त्याची
त्याच्या रंगीबेरंगी चेह-याची
कारण ............
लपवतो तो सर्वकाही त्या रंगामध्ये
आतलं युध्द, आतली तगमग
आतले अश्रू
आणि आतल हसू सुध्दा
अरे हे असं का होतय?
"मी" तर मीच आहे मग
मग हा आरसा मला ओळखत का नाहीय?
घेऊन गेला वाटतं तो "मुखवटा"
माझं मी पण
माझं स्वत्व
आणि ठेऊन गेलाय मागे
एक चेहरा
ज्याला ना ओळख आहे
ना कुठलं अस्तित्व

**भारती सरमळकर**
मुंबई

# चंद्रनहाण

पिंपळावरून पिंगळा बोलला
सपान चांदाचा निजल्या रातीला //१//

पानात पिंपळ  चांदण हासला
डोह्यात आसरा झिम्माड नाचल्या   //२//

वेळूच्या बनात माडाच्या कानात
वाराही धावून बोंबले जोरात //३//

गाभ्यास रातीच्या जुगला चांदुल्या
रातीन् काढल्या आभाली रांगोल्या //४//


आंब्याच्या राईत राघुच्या ढोलीत
डोल्यात मैनेच्या चांदणा शारद //५//

चंदेरी सपान डोल्याच्या शिपीत
शिवरी कणीस कापते डोल्यात //६//

सागरी शिपीत चांदुल्या बंदीत
मैनेच्या देह्यात राघुच्या  पंखात //७//

पिंपळावरून पिंगळा बोलला
नाह्यला दवात रातीचा चांदुला //८//

अनुराग कौशिक
पुणे


ई-साहित्य प्रकाशन




कवितांचा जागर
अतिथी संपादकांच्या लेखणीतून..
संपादकीय


सारे जहाँसे अच्छा


ई-साहित्य प्रकाशन
जागतिक महिला दिन विशेषांक
netakshare@gmail.com


महफिल - ए - गझल






ई-साहित्य प्रकाशन

# आपण फक्त नाममात्र.....

आपणच लिहीलेली कविता कधी कधी आपणच लिहीलेय यावर विश्वास बसत नाही. कारण 'कविता' खरंतर आपण लिहित नसतोच ती आपोआप जन्म घेते. ज्यावेळी ती जन्मते त्यावेळी परिस्थिती काय आहे, आपला मूड कसा आहे या सर्व गोष्टींवर तिचं जन्म घेणं/व्यक्त होणं अवलंबून असतं. प्रत्येक कलाकृती म्हणजे स्वतंत्र अस्तित्व असते. तिचं जन्म घेणं हे निश्चित असतं. आपण फ़क्त नाममात्र.

तसंच काव्यांजलीचं – कवितांच्या कम्युनिटीचं जन्म घेणं, त्यातून 'काव्यांजली दीपोत्सव' या दिवाळी अंकाचं जन्म घेणं आणि त्यातून 'नेटाक्षरी' चं जन्म घेणं निश्चित होतं. आम्ही फ़क्त नाममात्र.

'नेटीझन्स' ची मराठी भाषेविषयी गोडी वाढवावी, त्यांना कवितांकडे आकर्षित करावं. कवितांपर्यंत पोहचणारे कमी असले तरी, कविता आवडणारे लोक खुप असतात. आपल्या फ़ावल्या वेळात फुटकळ 'फॉरवर्डेड मेल' वाचण्यापेक्षा काहीतरी वेगळं, दर्जेदार, आकर्षक वाचकांना मिळालं तर ते का वाचणार नाहीत? एक तेवता तेजस्वी विचार घेऊन आम्ही ५-६ जणांनी ही नेटाक्षरी ची कल्पना मांडली, प्रत्यक्षात उतरवली. आणि बघता बघता कवितांच्या कम्युनिटीवरच्या कविता जे फ़क्त तिथलेच ४०-५० हजार सदस्य वाचत होते त्यापैकी निवडक कविता घेऊन त्या लाखो रसिकांपर्यंत पोहचवल्या. नुसत्याच पोहचवल्या नाही तर आकर्षक ई-मॅगझीन बनवले. नुसतं एवढं करून समाधान होईल तर ती कसली 'नेटाक्षरी' टीम , एक विषय घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करून त्यावर आधारीत कविता, संपादकीय, आणि तज्ज्ञ अतिथी संपादकाचा लेख, लेख म्हणण्यापेक्षा त्या विषयावरचे त्याचे मौलिक विचार.

व्वा ! आत्ताशा कुठेतरी काही केल्याचे समाधान वाटू लागले. पण झपाटलेपण काही स्वस्थ बसू देईना.



रेणु खटावकर
अमेरिका



एकूण प्रकाशित कविता ९९३

याही पुढे जाऊन काहीतरी करावे, केलेच पाहीजे हा विचार जोर धरू लागला. प्रसिद्ध कविंचे त्यांच्या जयंती निमीत्त विशेषांक काढावे की जेणे करून अशा कविंच्या आठवणींना उजाळा तर मिळेलच आणि नव्या पिढीला (इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांना देखील) त्यांची ओळख होईल, आणि मराठी मातीशी त्यांचे नाते आणखी घट्ट होईल. ही कल्पनाही प्रत्यक्षात उतरवायला आमच्या टीमला वेळ लागला नाही.

यानंतर **‘बाल नेटाक्षरी’**, **‘हास्य नेटाक्षरी’**, **‘स्वरनेटाक्षरी’** असे विविध स्वरूपात नेटाक्षरी वाचकांसमोर येत राहीले. वाचकांचे उदंड आणि अखंड प्रतिसाद हेच आम्हाला स्फ़ुर्ती देत होते. त्यातच ‘हास्य नेटाक्षरी’ चा वेगळा वाचक वर्ग असल्याचे आमच्या लक्षात आले आणि केवळ खास हसण्यासाठी आम्ही **‘ई-स्टाप’** एक धम्माल विनोदी अंकाची निर्मीती केली. खरंतर आपल्या फ़ावल्या वेळात हे काम करायचे आणि त्या बदल्यात भरपुर मानसिक समाधान, वाढणा-या ओळखी, होणारे कौतूक बस्स और क्या चाहिये !

एखादा गडी जरी त्याच्या वैयक्तीक कारणास्तव ७-८ धावा, एखादा २०-२५ धावा काढून बाद झाला तरी एक एक नवीन गडी खेळायला येतोच आणि डाव पुढे सुरुच रहातो. असं करत करत आम्ही नाबाद शतक करतोय. **येस्स! ‘नेटाक्षरी सेंच्युरी’** .



**रेणु खटावकर**
अमेरिका

# तुझे ठसे

पहा कधी ना कधी असेही घडेल काही
नसेन मी त्यामुळे तुझेही अडेल काही

तुझे ठसे चेहे-यात माझ्या नकोस शोधू
(मनात कोठेतरी तुला सापडेल काही)

कुठे असावा जुना जिव्हाळा ? कळेल तेही
तुला चांदणे बनून जेव्हा जडेल काही

अढी जराशी , ललाटरेषा बनून गेली,
मला भिती प्राक्तनास आता नडेल का ही ?

जुन्या स्मृतींनो ! मनात माझ्या हळूच या रे,
उठेल झोपेमधून आणि रडेल काही

सुखा, तुझे नेमके इरादे मला कळू दे
नको विचारू “व्यथा तुला आवडेल का ही ?”

लिहून टाका मनात जे जे असेल ते ते
खपेल काही, घरात थोडे पडेल काही

**ज्ञानेश पाटील**
जळगांव

# पेटली आग रक्तात

झुंजला मर्द मावळा घेऊनी
समशेर रणी धगधगती
पेटली आग रक्तात उसळली
शिवरायांची भक्ती

पोहचले गडावर राजे...रात्र वै-याची
थांबणे शक्य घटकाभर ...घाई निघण्याची
काळजी इथे कोणास...नसे मरण्याची
शिवशिवत बाहू उडवाया... शिरं मुघलांची

हा मर्द मावळा... गडात किल्लेदार
गडी इमानी... शुर.. वीर.. शिलेदार
गडावर निजले सारे राजांसव सरदार
बैसला मावळा... पहा-यावर तैयार

सरसावुन तलवार तळपती
.......ढाल करुनिया छाती
पेटली आग रक्तात उसळली
शिवरायांची भक्ती

अंधार गर्द शांतता... चोर पाऊले
गडास वेढा... शत्रु सरसावले
जीवास धोका... राजे गडी अडकले
मावळा एकटा... मुघल तीस ठाकले

एकटा नसे तो, असे सोबती... सह्याद्रीचे कडे
डगमगला ना एकही क्षण तो.. उरात वीरश्री
चढे ओढता कपाळी माती, वाजे... युद्धाचे चौघडे
महादेव हर, हर हर गर्जून... तुटूनी मावळा पडे

भक्तासाठी आली धावून
जगदंबेची शक्ती पेटली
आग रक्तात उसळली
शिवरायांची भक्ती

मुघलास वाटले... सहज करू पाडाव
एकटा मावळा... करेल किती मज्जाव
चहुबाजुंनी... मावळ्यास घेराव
घनघोर लढाई... घावावरती घाव

छातीवर झेलून... मुर्दाडांचे भाले
त्याचे शरीर सारे... जखमांनी रापले
रक्त मराठा... शौर्य जिवंत जाहले
उठलेले ते... हात सर्व कापले

मावळा आठवे... राजांचा प्रताप
बरसला घेऊनी... ज्वालामुखी संताप
दिसे शीर जे... धडावरी ते काप
उडे भितीने... मुघलांचा थरकाप

बावीस छाटले... आता आठच उरले
तलवार तळपली... रणांगणच थरथरले
मावळा गरजला... शौर्याचे वादळ उठले
सारे गलितगात्र... मुघलसैन्य लटपटले

उरले सुरले मुघल पळाले
...............पाहूनी शिवशक्ती
पेटली आग रक्तात
उसळली शिवरायांची भक्ती

**धुंद रवी**
पुणे

# मी बालक जेव्हा होतो

मी बालक जेव्हा होतो, हातात खुळखुळा होता
टांगते खेळणे वरती, इतकाच मामला होता

मी रांगू लागलो जेव्हा, बाहुली मिळाली छान
आवडे मला ती भारी, हलेना तिच्याविन पान

मी चालाया लागून, लागलो उड्या माराया
मज कौतुक वाटे मोठे, ते सर्वांना दावाया

मी कुमार जेव्हा होतो, रात्रंदिन भवरा फिरवी
मी पतंग, गोट्या खेळे, जिंकताच शेखी मिरवी

मी किशोर असताना हो, मी छंदामाजी जडलो
जमविली तिकीटे, नाणी, प्रेमात कथांच्या पडलो

तारूण्य माझीया दारी, वादळापरी मग आले
रमताच रमा-रमणीत, सर्वस्व तेच मम झाले

खेळणी बदलती होती, किती आली आणिक गेली
वाटती सत्य आत्ताची, ती मजा जुन्याची सरली

रिझवाया मजला का हे, कधीच पुरे ना पडले ?
चाखुनी जाहला चोथा, रसगंध त्यातले उडले

या जगतातील वस्तुंचे, खेळण्याहूनी ना मोल
जे सत्य अंतरी आहे, त्याच्या संगे तू डोल

**स्व. अहं ब्रह्मास्मि**
पुणे

# मराठी रक्त

साता समुद्रापार गेलो पण मातीचा वास गेला नाही
ईंग्रजी वाचुन थकलो पण मराठीचा ध्यास गेला नाही

शेक्सपियरला कोळले पण तुकोबाची कास गेली नाही
थेम्समध्ये न्हायलो पण चंद्रभागेची आस गेली नाही

आल्प्सच्या शिखरात फ़िरलो पण मन शिवनेरीवरच राहीले
महायुध्दाच्या समरभुमीवरही फुल मात्र शिवबालाच वाहिले

बल्जच्या खिंडीतही पराक्रम बाजीप्रभुंचाचाच आठवला
वाटर्लु पाहुन मनात मनात भाउंचा पानिपत साठवला

सर्वधर्म समभाव सांगताना मनात वैष्णवांची भक्ती केली
बायबल वाचतानाही मनात फ़क्त ज्ञानेश्वरीची उक्ती केली

**हरीश दांगट**
अमेरिका



मल्हार
I MISS YOU
हा अंक इंटरनेटवरील मराठी साहित्य प्रेमींना अर्पण


त्याचा वेलू गेला गगनावरी

# ने...

**नेटाक्षरीतला 'ने'**. त्या **'ने'** मध्ये मला स्वातंत्र्यवीरांच्या **"ने मजसी ने , परत मातृभूमीला"** मधला 'ने' दिसतो. आज असंख्य मराठी तरूण मंडळी परदेशात किंवा परराज्यात रहातात. आणि मराठी भाषेबद्दल म्हणाल तर अगदी महाराष्ट्रातल्या एखाद्या कार्यालयात सुद्धा वातावरण परदेशीच असतं. अशा आंग्राळलेल्या वातावरणात मराठीचा एक शब्द, एखादी सुंदर मराठी कविता मातीचा सुगंध देऊन जाते. मॉरिशसमधले प्रा. बिडुन अब्बा, लिस्बन मधली सुप्रिया चाफ़ेकर, कझाखस्तानातली प्रिती गरुड, माद्रीद मधले आनंद भंडारे, न्यु जर्सी मधले किशोर गोरे असे किती किती लोक ! नेटाक्षरी मुळे कळलं मराठी माणूस कुठे कुठे आणि किती पसरला आहे ते. कितीही ऊंचावर गेला तरी त्याची मातीची आणि मायबोलीची ओढ किती पक्की आहे ते. तमीळ महाकवी सुब्रमण्यम भारती यांनी मराठी माणसाला वाघ म्हटलं आहे आणि त्याच्या भाषेला कवितांची भाषा म्हटलं आहे. मराठीत काव्य जितकं समृद्ध आहे तितकं जगातल्या इतर कोणत्याही भाषेत नाही. मराठी मनावर कवींचा प्रभाव जितका आहे तितका जगात कोणत्याच भाषेत नाही. इंग्लंडात भले शेक्सपीअरचं स्मारक बनवत असतील. पण ज्ञानेश्वर तुकारामाच्या वाट्याला आलेला मान जगातल्या कोणत्याच कवीच्या वाट्याला आलेला नाही. म्हणूनच मराठी शब्द, मराठी कविता विश्वभरातल्या मराठी मनांना जोडते. आज इंटरनेटमुळे हे जुळवणं अधिक सोपं झालंय.




नाम गुम जायेगा

ठाणे



नेटाक्षरी

अंक क्र. १००



एकूण अतिथी संपादक ६६

मस्कतहून एकदा सुधीर नाईक यांनी एक मेल पाठ्वला होता. त्यांनी लिहीलं होतं “ माझ्याकडची “स्वामी” कादंबरी माझ्या एका मित्राने वाचायला नेली. काही दिवसांनी मी त्याला फ़ोन केला. तो त्याच्या मुलाने उचलला. मी विचारलं “बाबा आहेत का रे घरात?” त्याने लगेच आईला हाक मारली. म्हणाला, “mama ! someone is speaking in some <u>*STRANGE*</u> language” (कोणीतरी विचित्र भाषेत बोलतंय) .

सुधीर नाईकांनी नेटाक्षरी चळवळीची आवश्यकता सांगण्यासाठी ही मेल पाठवली होती. अशा मेल्सनी मुठभर मांस चढतं.

कालपरवा कुडाळच्या डॉ. मंगेश जांभळे यांनी कळवलं की त्यांची मस्कतची बहीण त्यांना नेमाने नेटाक्षरी पाठवते आणि आम्ही धन्य झालो.



**नाम गुम जायेगा**
**ठाणे**

# सेकंड हँड माल

चला या वर्षी आपलं जमलं बुवा
फुल टू फ़टाकडी पोरगी भेटली
माल...
नशीब आपले चांगले झाले
तशी दिसायलाही छान आणि बोलायलाही
चला, एकदाचे बाबांच्या मनासारखे झाले
आज जरा कट्टयावर बढाया मारू
पण कट्टयावर नको त्या चौकशा झाल्या
कुणी म्हटले, आधिची माहिती काढली काय ?
कुणी म्हटले , कॉलेजात काय ? एरिया कोणता होता ?
एक जण म्हणाला, "सेकंड हँड माल नको हां"
मग माझ्याही मनात हजार शंका
खरंच सेकंड हँड माल ?
बस्स कट्टयावर टाईमपास करून घरी आलो
बेडरूममध्ये एकटाच बसलो
मनात एकच विचार "सेकंड हँड माल"
समोर आरशात नजर गेली
ती "सेकंड हँड माल" तर मी ?
मी कोण ?
मी कालेजमध्ये काय केले
माझ्या जीवनात काय केले नाही ?
धूर ओढला, दारूही घेतली... आणि
हे मी पुरुष आहे म्हणून... लाईफ़ एंजाय केलं
पाहीजे ते मिळाले ... मिळवले
ती सेकंड हँड माल
तर मी ...?

**मित्र रवि**
मुंबई

# झंपप झपम झपम

झंपऽप झपम झपम झंपऽप झपम झपम
झंपऽप झपम झपम झम झपम झम
झंपऽप झपम झपम झंपऽप झपम झपम
झंपऽप झपम झपम झम झपम झम

वेगात जाऊ म्होरं, सुटलेला जसा तीर
रोखेल काय कुणात काही दम काही दम
रंगेल सारं जग, आपुल्या रंगातुन
एकेक पडूदे कदम, रे कदम
झंपऽप झपम झपम झंपऽप झपम झपम
झंपऽप झपम झपम झम झपम झम

नवीन आमुची ही गाणी रे
नवीन आमुचा हा सूर
पटली तर द्या हाताला टाळी रे
नाही तर हटा जरा दूर
आले रे वारे, आरूढ व्हा रे
पसरवुया आपुले तरंग रंग रंग रंग
झंपऽप झपम झपम झंपऽप झपम झपम
झंपऽप झपम झपम झम झपम झम

नव्याने मापे जुनी तोलुया
येते का पडा तिथे घट
फुटलेल्या कंठाने बोलुया
उपयोगी नाही कुजबुज
खोट्या जगाची, कोत्या दुनियेची
उडवुया चला दाणादाण द्‌ण द्‌ण द्‌ण
भंपऽप भपम भपम भंपऽप भपम भपम
भंपऽप भपम भपम भम भपम भम

"प्रिझमा"तुन इंद्रधनू सारुया

दावुया "एक" कसा रंग
दगडातुन देवाला काढुया
घेऊया त्यालाही संग
कसली रे भिती रोखठोक निती
मिरवा या ध्वजाचे पतंग तंग तंग तंग
भंपऽप भपम भपम भंपऽप भपम भपम
भंपऽप भपम भपम भम भपम भम

मिटलेल्या दारांना दे धडक
वारे हे आत घुम घुमू दे
मेघांना गीत द्या हे बेधडक
बरसू दे आणि गडगडू दे
वाजव रे घंटा, पिटवुया डंका
होऊ दे नाद जरा घण घण घण घण
भंपऽप भपम भपम भंपऽप भपम भपम
भंपऽप भपम भपम भम भपम भम

**कौस्तुभ आपटे**
डोंबिवली

# दंगलीनंतर तो भेटला

दंगली नंतर तो भेटला...
दिसतंय का तुला ?
काय रे ?
दिसतंय का?
हे भळाभळा वाहणारं रक्त
काय किंमत आहे त्याची
का स्वस्त झालंय
पाण्यापेक्षाही ?
म्हणूनच तू रक्त जाळायला
केरोसिन आणि पेट्रोल वापरतोयस
दिसतंय ना।
आपल्याच हातांनी
स्वतःच स्वतःचा खून पाडतोयस
ते तरी दिसतंय का ?
चाकू सुरे , दगड विटा
जे मिळेल ते घेऊन तू रक्तच वहावायला निघालास
सांडलेलं रक्त परत भरायची
किमया आहे का तुझ्यात ?
नाही ना ?
मग कशासाठी करतोयस हे ?
गुलाम आहेस का कुणाचा ?
तुला नादावणारे आहेत का कुणी ?
...
असतीलच
नाहीतर तुझ्या गांडीत तेवढा दमच नाहीये !

रुपेश गांधी
डोंबिवली

# Corporate ओव्या

– थोडेसे भाषेविषयी –

ही भाषा आपल्या मायबोलीसारखी भासली तरी ही
मायबोली नसून MY-बोली आहे
बाज मऱ्हाटीचा असला तरी साज English आहे
ह्या भाषेतील एक आदि काव्य

" जैसी ड्रिंक्स माजी Antiquity
फास्टफूडा माजी स्पेगिटी
languages माजी गोमटी
MY-बोली "

तर अशा ह्या MY-बोली मधील काही ओव्या
आहेत, इथे पुढयात फिरते जाते नसले तरी
कंप्युटरवर फिरणारी एखाद्या प्रोजेक्टची CD
नक्की असेल, थोडक्यात काय, व्यथा त्याच आहेत
फक्त जरा TechnoSavvy झाल्या आहेत.

नाही दळण कांडण
नाही दाणा ना कणीस
Corporatee भरडतो
एकमेकाले माणूस

मंदी मधि बिगडला
जमाखर्चाचा Ratio
खिशामाजी मोबाईल
कॉल कराया PCO

आला मार्च गेला मार्च
संगे आले रिसेशन
नाही मिळाला बोनस
अन नाही प्रमोशन

चालुगिरी चाटुगिरी
विश्वासघात दम
**corporatee** म्हणतात
ह्याले **Professionalism**

तत्व निष्ठा **morality**
ह्याचे सजले टेबल
सेल लागला लागला
**Price Negotiable**

माझ्या बॉसाची **PRO**
कशी दिसे **Tiptop**
कधी होई **desktop**
कधी होई **laptop**

माझ्या बॉस चे बोंसाले
जो जो लाविते **custurd**
त्याले मिलते रेटिंग
**I'll kill that basXXXX**

अजुनही खूप काही
होते मल्हे लिहायचे
शब्द सॅन्सॉर्ड जाहाले
आता ओठ शिवायाचे

**समीर सामंत**
मुंबई



# इवलेसे रोप लावियले द्वारी...

अशी आपल्या **नेटाक्षरीची** सुरवात.. खरच !!!! काहितरी करुयात या इच्छेने internet सारखा resource वापरून कल्पनेचा जन्म विचारातून आणि कल्पनेची पूर्ती लिखाणातून इतकच काय ते आम्ही केलं प्रत्येक अंकात... मनातून आलेला आवाज मनापर्यंत पोहोचवायचा आणि मिळालेली साद उमेद म्हणून पुढल्या अंकी वापरायचा... यातून निर्माण झालेल्या या नात्याला दृढ करण्यासाठी आज **१०० वा अंक** साजरा करायचा असं वाटलं ठरलं आणि केलं...

इतक्या English व professional mail मधून हळुच डोकावणारा मराठी mail आपण सर्वप्रथम ओपन करतो यात काही नवल नाही मग ते कुतुहल म्हणून असो वा अभिमान म्हणून... याच प्रसंगातून आपण एकत्र आलो.आणि हा वेलू बहरत गेला.२-५-१५-५० असे करत ८५००० वाचकांपर्यंत आम्ही पोहोचलो.. आणि नेटाक्षरीची पाळे-मूळे वटवृक्षाइतकी घट्ट झाली... तुमच्यासारखा वाचकवर्ग हिंच नेटाक्षरीची फ़लश्रुती आणि हेच आमचं यश... नेटाक्षरीवर असेच प्रेम करत रहा ही तुम्हास नेहमीच अभिमान देत राहिल...



**सचिन काकडे**
मुंबई

# सांजकविता

आज सांज झुरते आहे
एकलीच सरते आहे
रितं रितं आकाश,पण..
मनात ती उरते आहे

क्षितीजाचे रक्तिम कुंकू
तिचं मळवटच जणू
नवरंगी स्वप्न लेवते
मुक्तछंदी सांजच जणू

पापण्यांत स्वप्नलाटा
कड किंचीत ओलावते
आकाशाला पुसून डोळे
मन अलगद सैलावते

अभिजीत गलगलीकर
पुणे

# रिक्त

तप्त होते तृप्त झाले
बध्द होते मुक्त झाले
शांतशा एकांतडोही
व्यक्त आणिक रिक्त झाले

मादकशी देहवीणा
मन्मनी झंकारली
धून ती शृंगारलेली
तू सख्या की छेडीली

अस्पर्श होते कामीनी
प्रकटली ती दामिनी
विस्कटूनी त्या क्षणी मी
साज ल्याले यौवनी

गात्र बोले नेत्र ओले
तृप्त रसना रिक्त प्याले
देही देही गुंफूनी मी
व्यक्त आणिक रिक्त झाले

ऋचा घाणेकर
पुणे

# मृत देहास

गर्दीत हरवले कोण
उसवते वीण
जाणवे शीण
मृत देहास

गर्दीत थबकले पाय
हंबरे गाय
कशाचे काय
मृत देहास

गर्दीत आसवे काही
काळजी वाही
उन्हाची लाही
मृत देहास

गर्दीत कुणाचे कोण
आसवे दोन
बोलतो त्योम
मृत देहास

गर्दीत जातसे हरी
खांद्याच्या वरी
सुमनांच्या फरी
मृत देहास

**वर्षा पाटील**

# I QUIT

काहीतरी उणं असतं
काहीतरी अधिक असतं
I QUIT म्हणण्या इतपत
मित्रा. . . . . .
आयुष्य का वाईट असतं. . . ?

दोरीआड अडकलेल्या. ..
श्वासात सगळं संपतच असं नाही
बाबांच बोट
आईची कुस
देवाच्या घरी मिळतेच असं नाही. . .

ईच्छा आशा अन, आकांशा
सर्व उराशी बाळगायला हवीत
नाही मिळालं काही
तरीही हसत
पुन्हा नवी स्वप्नं पहायला हवीत


मित्रा
I QUIT म्हणण्याआधी
मित्रांच्या मिठीत थोडसं रडुन बघ
आयुष्य खरंच सुंदर आहे
त्याला थोडसं जगुन बघ. .

जितेंद्र घाणेकर
कल्याण


I QUIT




Young
&
Restless


संयुक्त वर्धापन सोहळा
विशेषांक
प्रमुख अतिथी - श्री. अशोक नायगांवकर
दिनांक - २२ नोव्हेंबर २००९, वाशी




आत्मशोध




CELEBRATING rePUBLIC DAY





# नेटाक्षरी.... एक सखी

**नेटाक्षरी** चा जन्म होण्या आधीचं माझं आणि हिचं नातं आहे. मी हिला "अगं" असं संबोधते, त्याला कारणही तसच आहे. माझ्या लेखी नेटाक्षरी हे केवळ एक ई-साप्ताहिक नसून आमच्या निर्मीती प्रक्रियेतून आलेली आमची एक सखी आहे. आम्ही सारी मंडळी , नेटाक्षरी आणि मी त्या कुटुंबाचा एक भाग कुटूंब म्हटलं की त्यात सगळंच आलं गप्पा टप्पा, गमती जमती, कवी कट्टे सगळंच! आजही तो दिवस आठवतोय, आम्ही नेटाक्षरीचे कुटूंबीय एक काहीसा उपक्रम करायच्या विचारात होतो... उपक्रम असा की काहीतरी नवं घडवावं, आपल्या कलागुणांना वाव देता येईल असं काहीतरी किंवा त्याही पुढे आपली माय मराठी च्या चरणाशी असलेली श्रद्धा भक्ती यांचा तिच्या जागतिकीकरणाकडे ओढा व्हावा म्हणून किंवा तत्सम काहीसं करता यावं असं प्रत्येक कुटुंबियाला वाटत होतं. ज्ञानेश्वर महाराजांची मराठी ती आपली मराठी आणि त्या मराठीचा लळा सगळ्यात रुळलेला होता.. तेंव्हा नवकाव्याला प्रोत्साहन आणि प्राचीनतेपासून अर्वाचीनतेपर्यंत ज्ञात अज्ञात साहित्याची ओळख, अभ्यास आणि आस्वाद घेणारा उपक्रम असावा असा एक आराखडा तयार झाला.

आता देश विदेशातले आम्ही कुटूंबिय आजकालचं प्रभावी माध्यम आंतरजालाच्या सहाय्याने एक एक तयारी पुर्ण करू लागलो. घरी एक बाळ जन्माला येणार म्हटल्यावर कसं लगबगीने तयारीला सुरुवात होते, अगदी तसं वातावरण होतं ते. मग बाळाचं नाव काय ठेवायचं ? ज्ञानेश्वरी जशी ज्ञानेशाची तशी ही नेट वरची अक्षरे म्हणून आणि ज्ञानेश्वरी साठी जसा मनातला आदरभाव, तसा मनभरून जिव्हाळा हिच्याबद्दल असल्याने, हिचं बारसं "नेटाक्षरी" करण्यात आलं. मग ह्या तान्हुल्या नेटाक्षरीचं कौतुक प्रत्येकजण जीवापाड जपू लागला. हिचा लोगो कसा असावा?, फ़ॉन्ट कसा असावा, रंग रूप खुलेल असा वेश कसा अन काय काय.. आमची तान्हुली नेटाक्षरी अंक दर अंकात वेगवेगळ्या साहित्यिकांच्या संस्कारात अधिकाधिक खुलु लागली.

तशी ही पोर फ़ार लाघवी हो.. जिथे जाईल तिथे आपलंसं करायची सगळ्यांना हे जणू ठरलेलंच, अन प्रत्येक वेळी नवा संदेश, नवी दिशा घेऊन समोर येताना वाचकांच्या मनाचा आढावा कसा मनकवड्या सारखा घेते ही.



**सुरुची नाईक**
नागपूर

अंका अंकातून लहानाची मोठी मोठी होत असताना बघतेय हिला. तसं एक एक रुप डोळ्यात साठवून ठेवावंसं वाटतं, हिच्या पाठीशी असंख्य वाचकांचे आशिर्वाद आहेत, अनेक चाहत्यांची हिला साथ आहे, अनेक संस्कार हिच्यावर घडत गेलेले आहेत, तसे ते इतरांवर घडवण्यात देखील नेटाक्षरीचा सिंहाचा वाटा आहे. अष्टपैलू नेटाक्षरी कधी देशातल्या प्रश्नांबरोबर आपल्याशी व्यक्त होते तर कधी, अंतराच्या खोलातली दबून बसलेली एखादी जाणीव अलगदपणे जागी करून जाते. कधी धीर गंभीरतेच्या अथांगतेमध्ये रुजवते तर कधी हलक्या फुलक्या कोवळ्याश्या गुदगुल्यांनी मनभर थुईथुई नाचत येते, कधी चंद्र तारकांच्या जादूनगरीची सैर करवते तर कधी वास्तवाचं दर्शन देखील घडवते..

पूर्वी नेटाक्षरी लहान असताना, तिच्याकडे एक ग़ॉंडस गोजिरवाणी बाहुली असावी तसं आम्ही बघत असू , पण उलगडता उलगडता तिची उंची ईतक्या वर गेलीय की मान उंचावून बघतांना अभिमानाची खुमारी येते. हिच्या ध्येयाकडची हिची वाटचाल बघतांना अभिमानाची खुमारी येते. आणि तान्हुलीच्या निर्मीतीचं सार्थक झाल्याचं जाणवतं..

नाही सांगता यायचं मला माझं हिचं नातं नक्की ... कदाचित मायलेकीच्या असतात तशाच दाट विणेनी विणलं आहे किंवा जीवाभावाच्या मैत्रीणीसारखी घट्ट मिठी घालून घेतलीय माहित नाही.. एक मात्र नक्की, नेटाक्षरीच्या दर एक अंकाबरोबर एक काहीसं नवं नातं घडवणारी नेटाक्षरी एका प्रगल्भ लाडक्या , सुसंस्कृत, आस्थापुर्ण गुणवत्तेचं दर्शन घडवते

नेटाक्षरीची ही वाटचाल अशीच अहर्निश सुरु असावी असा आशिर्वाद, अशा शुभेच्छा केवळ नेटाक्षरीलाच नव्हे तर तीचं हे रुप घडवताना अनेक वळणातून घडामोडीतून वाट काढत नेटाक्षरीला सुपंथ दाखवणा-या माझ्या कुटुंबियांना देखील देते. तसेच नेटाक्षरी वाचक मित्र परिवाराने नेटाक्षरीच्या येणा-या प्रत्येक अंकाचे स्वागत करुन आपल्या ह्रदयात मानाचे उच्चासन दिल्याबद्दल आभार मानते. यापुढे देखील आपली नेटाक्षरी अशीच आपल्या समोर नवनव्याने येत राहील अशी खात्री समस्त परिवारातर्फ़े देताना कृतकृत्य वाटत आहे. नेटाक्षरी परिवाराचे सदस्य होण्याचा आणि या नेटाक्षरीच्या निर्माणप्रक्रियेचा मी एक भाग असण्याचा अभिमान वाटतो.. हे कुटुंब आणि ही नेटाक्षरी यशोगाथेच्या शिखरावर अखंड असू देत ही ईश्वरास प्रार्थना.



**सुरुची नाईक**
नागपूर

नेटअक्षरी
अंक क्र.
१००

# रुसला गं विठा

कृष्णामाई मनास मोही,
स्तुतीस्तवन तुझे ।
गणेश करतो श्रीगणेशा
लिहूनी कवन तुझे ।।१।।

अगाध महिमा ऐसा तुझा गे,
अजोड ती महती ।
स्वयं गणेशा , रामदासांची
लिहीतो ही आरती ।।२।।

नयनांमध्ये साठवली मी,
मूर्त तुझी देखणी ।
कुरुकुरु कोरे सुबक अक्षरे,
गणेशाची लेखणी ।।३।।

गातो मंगल तुझी आरती,
आणि यशोगाथा ।
देवगणांच्या चरणी ठेवी,
उपेंद्र निजमाथा ।।४।।

**भूषण किनगावकर**
(क्लोरोफॉर्म )
अमेरिका

# रातराणी

तिने विचारलं, तुला कुठलं फुल आवडेल ??
तो क्षणात उत्तरला,

मनात जपायला चाफा आवडेल
आणि ओंजळीत धरायला मोगरा

वहीत ठेवायला बकुळ आवडेल
आणि धुंद व्हायला केवडा

बोलायला आबोली आवडेल
आणि फुलायला सदाफुली

पण प्राजक्त मात्र आवडेल तो
देवाच्या पायाशी ठेवायला
आशिर्वादासाठी

यावर ती थोडीशी नाराज झाली
कारण तिचं नाव रातराणी होतं

त्याने ते ओळखलं तो पुढे झाला
आणि हलकेच हसत म्हणाला,

हे सगळं नंतर आवडेल
रातराणी खिडकीशी दरवळल्यानंतर

तेव्हापासून ती अखंड दरवळते आहे
अंगणात ..................त्याच्या मनात !!

**महेश घाटपांडे**
मुंबई

# कातरवेळ

कातरवेळ भिरभिरते
भरल्या घरात शिरते
हुरहुरते अन
एकट्याच्याच मनात संधिप्रकाश कालवते
सगळ्यांचे डोळे चुकवत
एक अश्रू पापणीत येतो,थबकतो
दूरवर कुठेतरी वाजणारी व्हायोलीन समेवर आली
की मग..
गालांवरुन घसरतो..घरभर पसरतो..

**सचिन जायभाये**

# मुकुट मस्तकी

मुकुट मस्तकी
पाहुनिया थेट
होयील की भेट
कैवल्याची ।। १ ।।

चंदन तो टीळा
शोभतसे भाळी
ब्रम्हानंदि टाळी
लागलीसे ।। २ ।।

पितांबर शोभे
परीधान खास
भक्तांचा तो ध्यास
मनी आहे ।। ३ ।।

सावळे ते ध्यान
कर कटेवरी
चिंता नित्य करी
सकलाची ।। ४ ।।

वीट गोरोबाची
पावन ती झाली
चरणी लागली
सावळ्याच्या ।। ५ ।।

लागली समाधी
देवाचीच आता
आठवण होता
ज्ञानियाची ।। ६ ।।

**रमेश ढोंबरे**
औरंगाबाद


स्त्री...


घर आ जा परदेसी तेरा देस बुलाये रे


महाराष्ट्र - ५०
१९६० - २०१०


मुखवटा


ई - साहित्य प्रकाशन
वर्ष : दूसरे, अंक : १२
दिनांक : २२.०३.२०१०
हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी...
देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे
संपादक -
स्वप्ना कोल्हे ( नाशिक )
सहसंपादक -
सोनाली घाटपांडे ( पुणे )
भारती सरमळकर ( मुंबई )
सचिन काकडे ( मुंबई )


आभाळ सांगे रंग कहाणी
रमलेल्या पुसल्या दिवसांची....







# ही काव्यधुनी सतत पेटतीच राहील.....

**“ओंकार”** हे आद्याक्षर ब्रह्मांडाच्या कुठल्या पटलावर उमटले ठाऊक नाही. परंतु त्या आद्याक्षरापासून सुरू झालेली अक्षरब्रह्माची उपासना आज एका वेगळ्याच पातळीवर आणि वेगळ्याच पटलापर्यंत पोहोचली आहे. हा काव्ययज्ञ अहर्निश चालुच आहे, आणि आजच्या नवयुगात त्यानं ख-या अर्थानं वैश्विक स्वरूप धारण केले आहे.

मराठी सारस्वताने अक्षरातुन निर्माण केलेली साहित्यसृष्टी अद्‌भुत आहे. विश्वसाहित्यरत्नाकरामध्ये मराठी साहित्याने अर्पण केलेले अर्घ्य हे अवघ्या साहित्यसंपदेला आणखि श्रीमंत करणारे आहेत. ही मराठी साहित्यपरंपरा नवयुगातदेखिल अव्याहतपणे आणि नवस्वरूपात वाहत ठेवण्याचा विडा **“नेटाक्षरी”**ने उचलला आहे.

इंटरनेटने आधिच छोटे असलेले हे जग आणखि जवळ आणले. परंतु या छोट्या जगात मराठी रसिक मात्र सर्वदूर पसरलेले आहेत. काही वर्षांपुर्वी या अशा मराठी रसिकांपर्यंत साहित्यिकांनी पोहोचणे किंवा साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचवणे हे जवळपास अशक्यच होते. परंतु इंटरनेटच्या माध्यमातुन हे केवळ सहजच नाही तर अधिक प्रभावीही झाले आहे. इंटरनेटची हीच महती **“नेटाक्षरी”**ने ताडली आणि नेटाक्षरीचा जन्म झाला.



**सारंग भणगे**
पुणे

एकीकडे साहित्यक्षेत्राची पडझड झाल्याची बोंबाबोंब होत असतानाच **“नेटाक्षरी”** उत्तम आणि दर्जेदार साहित्य जगभराच्या कानाकोप-यात पोहोचवतंय; ते ही अगदी विनामूल्य. जीथे ईतर भाषांतुन नवीन कविता निर्माण होणे तर सोडाच, पण काव्यामधली अभिरुचीच नष्ट होत असताना **“नेटाक्षरी”** मराठी काव्याला नवसंजीवनी देत आहे. उपलब्ध साधनांचा सदुपयोग आणि दुर्दम्य ईच्छाशक्ती यातुन **“नेटाक्षरी”** एक अद्भुत इतिहास निर्माण करत आहे, याबद्दल दुमत असूच शकत नाही.

आज नेटाक्षरीचा शंभरावा अंक रसिकांसमोर ठेवत असताना अभिमानाबरोबरच एका उदात्त हेतूनं प्रेरित झालेला हा उपक्रम एका अनोख्या उंचीवर जात असल्याचे पाहुन एक अंतस्थ समाधानही आहे.

ही काव्यधुनी सतत पेटतीच राहील; आणि जगभरच्या काव्यधुरींना पेटवत राहील अशी खात्री आहे.




**सारंग भणगे**

पुणे

# माझे जगणे

माझे जगणे मुळात नाही माझ्यासाठी
मी उकलाव्या परदुःखाच्या कोमल गाठी

जखमेवरती फुंकर घालुनी प्राण भरावे
आणि कुणाच्या पापणीतले मेघ पुसावे

मी द्यावे आभाळ कोंडलेल्या पंखांना
कुरवाळावे मूक अंतरीच्या डंखांना

दे परमेशा ऊब एवढी ह्या तळहाती
केवळ स्पर्शाने उजळाव्या विझल्या वाती

मी कोणाच्या श्रद्धेसाठी फुलून यावे
आणि शेवटी तुझ्या पावली निर्माल्यावे

**प्रसन्न शेंबेकर**
नागपूर

# ती

ती समीप माझ्या येते, निसटुन जाते
मी स्तब्ध, बावरी मलाच विसरुन जाते

ती देउन जाते अर्थ नवे शब्दांना
जोजवते ह्दयी सृजनाच्या स्वप्नांना
संध्यारंगांसह नभात मिसळुन जाते

तळहाती रेखुन अलगद हलकी रेषा
तनमनी जागवुन अनामिक भाषा
ती मोहरलेल्या क्षणांत हरवुन जाते

मी त्या रेषेवर लिहीते काहीबाही
ते मनासारखे कधीच उमटत नाही
ती सहजच त्या ओळींना सजवुन जाते

ती रसिक, साजिरी सखी कल्पना माझी,
ती कविता, आराधना, साधना माझी
निर्भेळ सुखाच्या राशी उधळुन जाते

**क्रांती सडेकर**
नागपूर

# पाऊस

आत आत बाहेर जळत राहतो पाऊस
पुन्हा जखमा ओल्या करत राहतो पाऊस

तुझ्या आठवात कधी तुझ्या विचारात
गाणं तेच तेच म्हणत राहतो पाऊस

चाहूल न लागे,जोवर तुझ्या पावलांची
कसा नभातच झुरत राहतो पाऊस

किती तुज स्पर्शिल्या,अन किती पळ हुकल्या
हिशेब धाराधारांचा करत राहतो पाऊस

तुला न्यायचे पार त्या ढगांच्या गावी
कल्पनेत आतल्या आत भिजत राहतो पाऊस

पण पाहून तव हात,हातात माझ्या
कसा डोंगरा आडूनच परत जातो पाऊस

सोडून तू गेलीस मज,त्या दिवसापासूण
मृगातच हस्तासारखा पडत राहतो पाऊस

तुला निभवता नाही आले प्रेम त्या फुलाचे
चिखल चेहऱ्यावर उडवत राहतो पाऊस

अरे आता बरसणे नाही रे पूर्वीसारखे
पापण्यांवर मेघ ठेवून रडत राहतो पाऊस

**कौस्तुभ आपटे**
डोंबिवली

# अवतार

खुप केलात टिळक आता आणखी एक करा . . !!
षंढ झालोय आम्ही तुम्हीच आता अवतरा . . .!!

इतिहास आता पुस्तकांपुरता
आणि तुम्ही पुतळ्यांपुरते राहिलात. . .
या दगडांसाठी तुम्ही,
स्वराज्याचं स्वप्न पाहिलात. . ?
शेंगा खाणारे आजही टरफ़ले टाकतात
आणि न खाणारेच वाकतात. . .
एकात्मता बघा आमची
गल्ली-गल्लीला गणपति लागतात. . .
तुमच्या जन्म सिध्द हक्काला
आज किंमत राहिली नाही. . .
खरच सांगतो टिळक
मंडालेची भिंत, कुणीच पाहिली नाही. . .
तुमची आठवण येते टिळक
फ़क्त बॅनर लावण्यापुरती. . .
आणि आमचेच फ़ोटो असतात
ढीगभर, तुमच्या वरती. . .

एवढं मात्र करा टिळक
झेंडा बघुन खाली उतरा. . .
आपला नाही राहिला आता
तो हिमालयाचा कतरा. . .
तुम्ही येउन बघा तरी
खरंच आता आझाद आहे देश. . .
गंगा आणि सिंधु मध्ये
फ़क्त आडवी आलीये रेष. . .
फुगत आहेत बुरूज खोटे
हे सोनेरी गज वाकवा. . .
भगव्या आणि केशरी मधला
तो फ़रक तेवढा दाखवा . . .
खुप केलात टिळक आता आणखी एक करा . . .!!
षंढ झालोय आम्ही तुम्हीच आता अवतरा . . .!!

सुधीर मुळीक
मुंबई


Good things
Come in
small
Packages!
: संपादक :
आरती सरमळकर (मुंबई)
: सह संपादक :
सोनाली घाटपांडे (पुणे), स्वप्ना कोल्हे (नाशिक)
सचिन काकडे (मुंबई)


प्यारे दरसन दिज्यो आय,
तुम बिन रह्यो न जाय ।।
जल बिन कमल, चंद बिन रजनी ।
ऐसे तुम देख्यां बिन सजनी ।।
आकुल व्याकुल फिरूं रैन दिन,
बिरह कलेजो खाय ।।
दिवस न भूख, नींद नहिं रैना,
मुख सूं कथत न आवै बैना ।।
कहा कहूं कुछ कहत न आवै,
मिलकर तपत बुझाय ।।
क्यूं तरसावो अंतरजामी,
आय मिलो किरपाकर स्वामी ।।
मीरां दासी जनम जनम की,
पड़ी तुम्हारे पाय ।।
संत मीराबाई


।। अवघी विठाई पंढरीचा राणा ।।
।। कटेवर हात विटेवरी उभा ।।









कामगार सूर्य हरपला .....
नारायण गंगाराम सुर्वे


गुरुदेव
संपादक -
स्वप्ना कोल्हे ( नाशिक )
सहसंपादक -
सोनाली घाटपांडे ( पुणे )
भारती सरमळकर ( मुंबई )
सचिन काकडे ( मुंबई )
बंगाली मिठाईत..


लोकमान्य
बाळ गंगाधर टिळक
स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे
आणि तो मी मिळवणारच !
महाराष्ट्राच्या ह्या जहाल
'केसरी' ला
चे
कोटी कोटी वंदन !
: संपादक :
सचिन काकडे (मुंबई)
: सह संपादक :
सोनाली घाटपांडे (पुणे)
स्वप्ना कोल्हे (नाशिक)
भारती सरमळकर (मुंबई)
ई-साहित्य प्रकाशन
वर्ष दुसरे, अंक २२
दिनांक : १ ऑगस्ट

# गोदाकाठची गंगा....

मी कु.स्वप्ना कोल्हे,नाशिक.नेटाक्षरी संपादक, मी एम.सी.एम.केलेले असून मी आयटी क्षेत्रात कार्यरत आहे.नेटाक्षरीशी माझं नातं त्याच्या जन्माआधीपासूनचे. अगदी,जसं सूर्य आणि ग्रहमालिका तयार होतांनांचं साक्षीदार असावं तसं.पण,इथे मी निव्वळ साक्षीदार नाही तर जन्मदात्रीच्या देखील भूमिकेत आहे.त्यामुळे जसं आईला आपल्या बाळाचं किती कौतुक करु आणि किती नको असं नेहमी होतं असतं तसंच नेटाक्षरीविषयी लिहतांना माझं होतं तरीही नेटाक्षरीच्या १०० व्या अंकाच्या निमित्ताने मात्र मी माझे मनोगत इथे संक्षिप्त स्वरुपात प्रकट करीत आहे.

मराठी काव्य रसिकांना मराठी कविता वाचायच्या असतील तर त्या ब्लॉग,कम्युनिटीज ह्यांतून नेहमीच उपलब्ध असणार आहेत.ह्याची कल्पना आम्हाला नेटाक्षरी सुरु करण्याचा विचार मनात आला तेव्हापासून होती.नेटाक्षरीमधून आम्ही असं वेगळं काय वाचायला देणार की वाचकांनी आमच्या अंकाची वाट पहावी ? प्रत्येक कवी/कवयित्रीला आपली कविता नेटाक्षरीच्या एखाद्या का अंकात होईना पण प्रसिध्द व्हावीच असे मनोमन वाटावे ? विद्यार्थी असो वा गृहिणी,इंजिनिअर असो वा व्यापारी त्या व्यक्तीला नेटाक्षरीचा अतिथी संपादक बनून आपले मनोगत जगभरात पोहचवावे असे का वाटावे ? हे सारे प्रश्न उपस्थित झाल्यावर त्यांची उत्तरे नेटाक्षरीचा अंक “खुद्द” असावा असा आम्ही संपादकांनी मनोमन निश्चय केला होता.दर्जा,मांडणी ह्यात कुठेही तडजोड न करता जुन्या-नव्याचा सुरेख मेळ घालत नेटाक्षरीने आज १०० व्या अंकापर्यंत मजल मारली आहे.



स्वप्ना कोल्हे
नाशिक



सर्वात लहान कवयित्री
-------
चैताली म्हापसेकर
(वय १८ वर्षे)

मी मुळातच कवीमनाची एक संवेदनशील मुलगी असल्याने नेटाक्षरी संपादक आणि नेटाक्षरी वाचक ह्या दोन्ही भूमिकांतून मी नेटाक्षरीकडे बघत असते.नवकवींना नेटाक्षरीतून संधी देतांना जुन्या कवींवरचे विशेषांक प्रकाशित करण्यावरही माझा विशेष भर असतो.कारण,जुन्या कवींच्या कवितांचे अमृताचे झरे नव्या पिढीत झिरपून त्यांच्या अंर्तमनातून अमृतकाव्याचे कारंजे उसळावेत ही त्यामागची माझी भावना असते.

मराठी साहित्यातले दिग्गज भाऊसाहेब पाटणकर,जगदीशखेबुडकर,कुसुमाग्रज,ना.घ.देशपांडे,विं.दा. करंदीकर,अरुण काळे ह्या सर्वांवर मी विशेषांक प्रकाशित केले आहेत.तसेच गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या निवडक मूळ बंगाली कवितांचा मराठी अनुवाद करुन मी त्यांच्यावर आधारित विशेषांक प्रकाशित केलेला आहे.ह्यामागचा माझा उद्देश मराठीत अनुवादित साहित्य निर्मितीला प्रोत्साहन देणे हा होता.

अशा ह्या विशेषांकांसंदर्भात एक हृद्य आठवण मी जरुर सांगू इच्छिते.ती आठवण आहे समकालीन कवितेचे महाकवी अरुण काळे ह्यांचा विशेषांक तयार करतांनाची.अरुण काळे सरांशी माझी पहिली आणि अखेरची भेट जानेवारी २००८ मध्ये एका काव्य शिबीरात झाली.माझे कवितावाचन सुरु असतांना अचानक लाईट गेले.माईक बंद पडला होता त्यामुळे उपस्थितांनी मला माझी कविता पुन्हा सादर करायचा आग्रह केला.तेव्हा अरुण काळे सरांनी स्वतः त्यांच्या दमदार आवाजात माझी कविता वाचली.कवितेचे रसग्रहण केले व कौतुकही.त्यांची स्वाक्षरी घेतांना जेव्हा मी त्यांना माझ्या कवितांच्या ब्लॉगविषयी सांगत होते तेव्हा ते म्हणाले की, मलाही माझ्या कविता इंटरनेटवर प्रकाशित कराव्याशा वाटताहेत, माझी वेबसाईट बनवावी असे वाटत आहे. तू मला मदत करशील का? मी तात्काळ हो म्हणाले व त्या कार्यक्रमानंतर 1 महिन्याने त्यांच्या आकस्मिक निधनाची दुःखद बातमी वर्तमानपत्रात आली.



**स्वप्ना कोल्हे**
**नाशिक**

माझे मन सुन्न झाले होते.जणू काही त्यांनी त्यांचं एक स्वप्नंच माझ्याजवळ बोलून दाखविलं होतं.आणि ते पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी आता माझी होती.ज्या काव्य शिबीरात अरुण काळे सर मला भेटले होते त्या शिबीराच्या आयोजकांचा पत्ता माझ्याकडून हरवला होता.त्यामुळे मी कुठल्या दिशेने प्रयत्न करु हे मला समजत नव्हते.पण,जेव्हा तुम्ही एखाद्या सत्कार्याची प्रबळ इच्छा करतात तेव्हा सारे जगच तुमच्या कार्यपूर्तीसाठी तुमच्या मदतीला धावते.एके दिवशी त्या काव्य शिबीराच्याच आयोजकांचा मला फोन आला.त्यांना माझी कविता त्यांच्या त्रैमासिकात छापायची होती.मी सदगदित होऊन त्यांना माझी इच्छा सांगितली आणि हा अंक तयार करण्यासाठी अरुण काळे सरांचे निकटवर्ती मित्रवर्य काशिनाथ वेलदोडे(कवी,संपादक-करुणापर्व),शशिकांत हिंगोणेकर (गट शिक्षणाधिकारी-पंचायत समिती,जळगाव), संजय वाघ (लेखक, वरिष्ठ उपसंपादक-लोकमत), प्रा.एम.एल.नकोशे (सहसंपादक-करुणापर्व)ह्यांनी अतिथी संपादक बनण्याचे मान्य केले व हा विशेषांक अरुण काळे ह्यांच्या प्रथम स्मृतीदिनी आम्ही प्रकाशित केला. मला वाटते की,प्रत्येक व्यक्तीजवळ काहीना काही सांगण्यासारखे असते आणि ह्याच्यासाठी नेटाक्षरीसारखे दूसरे व्यासपीठ नाही.कारण,नेटाक्षरीचा वाचक सुजाण व संवेदनशील आहे.मराठी माणूस कामकाजाच्या ठिकाणी जरी अस्खिलीत इंग्रजीत बोलला तरीही हृदयातून मात्र तो मराठीतच विचार करतो हे तो नाकारणार नाही.



**स्वप्ना कोल्हे**
नाशिक



सर्वात वयस्क कवी
-------
स्वा. वसंत हुदलीकर
(वय ८४ वर्षे)

नेटाक्षरीमधून कविता प्रकाशित करण्यासोबतच त्या अंकाच्या अतिथी संपादकासही प्रकाशझोतात आणण्याचा माझा मानस असतो. उदा.२६ जानेवारीच्या अंकातून स्वातंत्र्यसैनिक वसंत हुदलीकर,महिलादिन विशेषांकातून नाशिक येथील महिला आश्रमशाळेच्या संचालिका प्रा.सौ.निशा पाटील तसेच ऑस्ट्रेलियात स्थायिक असलेली इरावती पाटकर (कथ्थक नृत्यांगना, नाट्य अभिनेत्री), अनिवासी भारतीय विशेषांकातून स्वप्ना जोशी (Barclay,Governance risk partner, London), कुसुमाग्रज विशेषांकातून प्राजक्त देशमुख (कवी,अभिनेता,दिग्दर्शक), आयुष्याची सकारात्मक सुरुवात करायचे आवाहन करणाऱ्या अंकातून कवी हर्षल पाटील,मित्र मैत्रिणीचे नाजूक नाते मांडणाऱ्या अंकात कवी प्रशांत रेडकर,कवी व professionalism म्हणजे काय हे दाखवणाऱ्या अंकात डॉ.अशोक कुलकर्णी अशा अनेक व्यक्तींचे मनोगत अन कार्य आम्ही जगासमोर आणलेले आहे.२६ नोव्हेंबरला मुंबईत झालेल्या आतंकवादी हल्ल्यावर आधारित एक विशेषांक मी त्या हल्ल्याच्या प्रथम स्मृतीदिनी प्रकाशित केला होता ज्यात एक मुंबईकर म्हणून रवींद्र भांगे ह्या होतकरु छायाचित्रकाराने आपले मनोगत व्यक्त केले होते.

नेटाक्षरीसोबतच्या माझ्या प्रवासात माझ्या वैयक्तिक आयुष्यातही अनेक चढउतार येत गेलेत.पण माझी आणि नेटाक्षरीची साथ मी सुटू दिली नाही.घरी इंटरनेट नाही व ऑफिसमध्ये इंटरनेट वापरायला परवानगी नाही अशा परिस्थितीत अनेकदा मी नेटाक्षरीचा अंक सायबर कॅफेत जाऊन तयार केलेला आहे. काविळीमुळे आलेल्या अशक्तपणामुळे जिथे मला उठबस करणे मुश्किल झाले होते तिथे मी कुसुमाग्रज विशेषांक मोठ्या उत्साहाने अन हिंमतीने तयार केला. नेटाक्षरीचा अंक तयार करतांना त्यामागे जशी संपादकाची मेहनत असते तशीच अनेकदा त्यामागे रोचक कहाणीही असते.



**स्वप्ना कोल्हे**
नाशिक

अंक क्र.
१००

वाचकाला सुंदर अंक वाचायला जरुर मिळतो पण तो अंक तयार कसा झाला असेल ह्याची त्याला साहजिकच कल्पना नसते.कुठल्या अडचणींवर मात करुन तो अंक त्यांच्यापर्यंत आम्ही पोहचवला आहे हेही त्यांना माहीत नसते.जगदीश खेबुडकर विशेषांकाचीही अशीच रोचक कथा आहे. ४ मे ११ ला सकाळी ६.३० मिनीटांनी ई साहित्य प्रतिष्ठानचे सुनील सामंत काका ह्यांनी अंकाचा प्रस्ताव मला एसेमेस केला.ऑफिसमध्ये इंटरनेट वापरायला परवानगी नसल्याने घरी आल्यानंतर संध्याकाळी मी विशेषांक तयार करायला सुरुवात केली व मध्यरात्री २.१० मिनीटांनी आमच्या टिमकडे अंक वितरीत करायला ईमेल केला.

थोडक्यात,नेटाक्षरी संपादक बनण्यासाठी तुमच्याकडे काय हवे ? ऐका मग.तुमच्यात passion हवे ,दिवानगी हवी committment हवे. आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढायची हिंमत हवी. दूरदृष्टी हवी.

माझी ही अशी सगळी धडपड पाहून अनेकदा गंमतीने आणि काहीशा काळजीने माझी दोस्तमंडळी मला म्हणतात,"स्वप्ना,तू हे जे सारं करते आहेस ते कशासाठी ? ह्याचा काय उपयोग आहे?कशाला एवढा जीव काढते आहेस?"

ह्यावर मी हलकेच हसून देते आणि म्हणते,"कविता माझं प्रेम आहे आणि मराठी भाषा माझा अभिमान आणि ह्या दोन्ही गोष्टींचा संगम नेटाक्षरीत होतो.२००९ सालचा मला मिळालेला साहित्यभूषण पुरस्कार देखील माझ्या ह्या मराठी भाषेच्या प्रेमाचंच तर फलित आहे.जोपर्यंत जीवात जीव आहे तोवर ई साहित्य प्रतिष्ठानसाठी मी कार्यरत राहणारच. प्रेम आणि अभिमान जिथे असतो तिथे तडजोड नसते, स्वार्थ नसतो.समर्पण असते.पूजा असते."



**स्वप्ना कोल्हे**
नाशिक

अंक क्र.
१००

एकूण
प्रकाशित
अंक
१००

# शक्तीदुर्गा

एकटी मी,ना कुणाच्या सोबतीने रांगायचे
धाकटी जरी,वीज मी,संकटांना ना भ्यायचे

बाप, बंधू,पुत्र, नवरा आजवर आधार गं
नीच मी;अबला;अशी आजवर समजूत गं
मनगटातील स्फुल्लिंग माझ्या मी अता चेतायचे
धाकटी जरी,वीज मी..

संत सज्जन शिकवूनी गेले मला भक्ती खरी
माय दुर्गा नांदते शक्ती बनूनी अंतरी
रणचंडिका मी शूलधारी म्हैषासूरांना तुडवायचे
धाकटी जरी,वीज मी..

मी लता नाही कुणाचा आधारवड शोधायला
विद्युल्लता मी झळकते,विश्व सारे उजळायला
आज अडविल जर कुणी तर आडवे घालायचे
धाकटी जरी,वीज मी..

कोवळी असले तरी ना मुळी अलवार मी
कमनीय बांध्याची अशी दोधारीची तलवार मी
घाव जर पडला कुणावर चिंधड्या ते व्हायचे
धाकटी जरी,वीज मी..

आजवर जे सोसले आता नसे मंजूर ते
भय कशाचे एकवटूनी शक्ती सारी झुंजते
बुरशी चढलेल्या विचारांची भुते गाडायचे
धाकटी जरी,वीज मी..

स्वरांगी देव
इंदूर

# जातोच आहेस गावाकडे तर

जातोच आहेस गावाकडे तर
वेशीवरल्या सह्याद्रीला सांग नमस्कार माझा
म्हणावं,तू ढाल होऊन उभा आहेस तिथे
म्हणूनच लढतोय इथे मावळा तुझा
वेशीवरनं एस.टी आत वळेल
अलगद अडखळत माझ्या गावात घुसेल
माझे गाव,माझे जग
सारं डोळ्यांनी टिपून घे
कणकण साचवून शिदोरी बांधून घेऊन ये
जातोच आहेस गावाकडे तर
माझ्या घरीही जाऊन ये
दारात माझे मुके जनावर असेल माझी वाट बघत
थोपट त्याला प्रेमाने अन
येतोय म्हणून सांगून ये
घरी माझी आई असेल
तिला म्हणावं,काळजी घे
साचलीच माझी आठवण डोळ्यांत तिच्या
तर ती माया थेंबभर घेऊन ये
थोरला भाऊही भेटेल माझा
काही बोलू नकोस,वाकून नमस्कार कर
त्याच्या पायाखालची चिमूटभर धूळ घेऊन ये
एवढं माझं काम कर
जातोच आहेस गावाकडे तर
तर लवकरच परतून ये
दूर इथे मी हळवा व्याकुळ
गावाकडचे सुख तेवढे घेऊन ये

**सूरज देशपांडे**
पुणे

# पाऊस असा कोसळतो

पाऊस असा कोसळतो
एकांती जीव जळतो
रंग धुंद धुंद
गंध कुंद कुंद
एकांती जीव तडफडतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
घन गडाड गड
वीज कडाड कड
गंधार नभी घुमतो
अंधार चिंब डसतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
तन चूर चूर
मन पूर पूर
विरह उरी चुभतो
शृंगार उगी पाहतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
वाट पाही पाही
साथ नाही नाही
सरण हे रचतो
मरण रे मागतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो

**स्वप्ना कोल्हे**
नाशिक

# प्रश्न तसाच राहतो

मी हटायचे की हट्टाने रेटायचे  प्रश्न तसाच राहतो
भीड चेपायची की भीक घालायची
प्रश्न तसाच राहतो

मीपण जपायच की माझं स्वत्व
प्रश्न तसाच राहतो
कुढत जगायच की जगवायचं अस्तित्व
प्रश्न तसाच राहतो
अभिमान जपायचा की स्वाभिमान
प्रश्न तसाच राहतो
मोडून वाकायच की वाकून मोडायच
प्रश्न तसाच राहतो

पेटून उठायचं की कुणीतरी पेटायच
प्रश्न तसाच राहतो
झोकून द्यायच की वाकून पहायच
प्रश्न तसाच राहतो


आपणच आपलेपण सिध्द करायचे
विस्तव आला तरी स्वत्व आता जपायचे
शिवबा नाही होता आले हे तर चालायचेच
नंगी तलवार उचलता येते एवढे तरी करायचे
मग प्रश्न कधी प्रश्न उरणार नाहीत
उत्तरे कुणाकडे मागावी लागणार नाहीत
आता फक्त ताठ कणा अन मानानं जगायचं
पाठीवरचा वार फक्त छातीवर घ्यायला शिकायच

**प्रसाद जोशी**
पुणे

# शून्य आहे मी

अंधा-या खोलीत बसुन,
दिवसरात्र विचार करतो
जगलोच नाही जे त्या
आयुष्यावर लिखाण करतो
अपयश आले म्हणुन
संसार सारा मिथ्या म्हणतो
भंग होता प्रेम माझे
मोह माया म्हणतो
जीवनाच्या अनिश्चीततेवर
खरडलय बरंच काही
प्रगल्भतेचा आव आणुनी
उपदेश मात्र सांगत राही
बुडापासुन डोक्यापर्यंत
शुन्य आहे मी
अन लोक भेटुन म्हणतात
धन्य जाहलो आम्ही

शशांक प्रतापवार
पुणे


कातरवेळ


Enjoy Kidding


॥ शुभ दिपावली ॥
मंतरलेली प्रभा नवी अन
मंतरलेले दिवस नवे...
कंदिल ल्यूणवी चांदोबाला
दारोदारी नवलक्ष दिवे...
सर्व रसिक वाचकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा




ई-साहित्य प्रतिष्ठान, वर्ष दुसरे, अंक - २१, २५ ऑक्टोबर २०१०
अंतराळाबाहेरील काव्यनक्षत्रे
भारती सरमळकर (मुंबई)
सह संपादक
सोनाली घाटपांडे (पुणे)
स्वप्ना कोल्हे (नाशिक)
सचिन काकडे (मुंबई)
'मी कवी'
विशेषांक
LIGHT OF A NEW BEGINNING




इस सवाल का जवाब नहीं
संपादक
सचिन काकडे ( मुंबई )
सहसंपादक
स्वप्ना कोल्हे ( नाशिक )
सोनाली घाटपांडे ( पुणे )
भारती सरमळकर ( मुंबई )
या अंकात वाचा..
❖ प्रश्नार्थक कविता ?
❖ संपादकीय


Mens n Roses


ते रंग नवे
ते शब्द नवे
ते भाव नवे
ते गंध नवे
भारती सरमळकर (मुंबई)
सचिन पावसकर (मुंबई)
सोनाली घाटपांडे (पुणे)
स्वप्ना कोल्हे (नाशिक)
सचिन काकडे (मुंबई)

# ते भाव नवे... ते बंध नवे...

नमस्कार मंडळी..

**नेटाक्षरीचा हा शंभरावा अंक**, मराठी भाषा आणि तिचा प्रचार प्रसार करण्याचा ध्यास घेतलेल्या ई-साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व मंडळीसाठी हा परमोच्च आनंदाचा क्षण. गेली जवळपास २.५ वर्ष सातत्याने मराठी रसिकांना उत्तम दर्जाचं साहित्य पुरवत नेटाक्षरीने आज शतकी मजल गाठली आहे.

नेटाक्षरीच्या कुटुंबात तसा मी नविनच.. अक्षर अंगण या कार्यक्रमाच्या निमित्ताने आमची भेट झाली आणि या कुटुंबात मी अलगद सामावुन गेलो. मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या गच्चीवर या कार्यक्रमात आमची गट्टी जमली. पुढे ८४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातील काव्यजागर तसेच इतर उपक्रमांमुळे या नात्याला अधिक बळकटता आली. ई-वर्ले अक्षर या कवितांच्या धमाल कार्यक्रमासाठी नाशिक आणि पुणे येथे या मंडळीं सोबत जाणं झालं इथे होणाऱ्या चर्चा, संवाद, काव्य मैफिली यातुन बरच काही शिकायला मिळालं. खरतर अक्षर अंगण या कार्यक्रमानंतर माझ्या वाचनाला एक नविन दिशा मिळाली. वाचन आणि कवितेवरचं प्रेम आणखी वाढलं.आपल्या मराठी भाषेसाठी आपल्या हातुन काहीतरी चांगलं घडतय, काहीतरी विशेष करायला मिळतय याचं समाधान नेटाक्षरीचा संपादक झाल्यानंतर मिळाल. मी या अत्यंत लोकप्रिय साप्ताहिकाचा संपादक होण्यामागे या अंकाशी निगडीत असलेल्या अनेक मंडळींचा सहृद सहभाग आहे. नामकाका, सचिन काकडे, आनंद माने, भारती सरमळकर, सोनाली घाटपांडे या सर्वांचा इथे उल्लेख करणं आवश्यक आहे कारण त्यांच्या विश्वास, धीर व मदती शिवाय ते अजिबात शक्य नव्हतं. नेटाक्षरीच्या सर्व रसिक वाचकांचे पुन्हा एकदा मनापासुन आभार. तुमच मराठी भाषा आणि आमच्या वरच प्रेम असंच अबाधित आणि वृध्दिंगत होत राहो हीच अपेक्षा आणि प्रार्थना.



शशिकांत रणवरे
ठाणे

नेटाक्षरी
अंक क्र. १००

एकूण कवी ३५१

संपादक होण्यापुर्वी अतिथी संपादक म्हणुन **"संकल्प"** हा माझा पहिला अंक. नविन वर्षाचा हा पहिलाच अंक असल्यामुळे त्या नुसार याची बांधणी करण्यात आली होती. नैराश्याच्या खोल दरीतुन वर डोकाऊ पहाणाऱ्या माझ्यासारख्या नवोदितासाठी या अंकातील कविता बरच धैर्य देणाऱ्या होत्या. विशेषतः प्राजक्त देशमुख याची पुढील कविता आपल्या सर्वांनाच भावलेली व आयुष्याकडे सकारात्मक द्रुष्टीने बघण्याचा संदेश देणारी आहे.

माझा संपादक म्हणुन पहिला अंक होता **"एक कटिंग चाय"**. विषयाचा विचार करताना नामकाकांनी सांगितलेल्या काही गोष्टी सतत मनात घोळत होत्या. काहितरी वेगळं पण भावणार अस काही तरी करायच होत. प्रेम आणि विरह कवितांच्या पुरात कुठेतरी आडोशाच ठिकाण शोधाव असं वाटल. काहीतरी नविन देण्याचा संकल्प या आधीच केला होता. विषयाच्या बाबतीत बराच संभ्रम होता. पण "एक कटिंग चाय" ने तो सोडवला.कटिंग चायच्या वाफेसोबत घडलेल्या अनेक गोष्टींचा इथे मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अंकातील सर्व कविता उत्कृष्ट होत्या. त्यातलीच ही एक सुधीर मुळीक यांची कविता.

**"रिकामी फ्रेम"** हा अंक खरतर मला खुपत असलेल्या असहाय रिकामेपणाचं, एकाकीपणाचं प्रतिबिंब होता. या अंकात मला नुसतीच एक रिकामी फ्रेम दाखवायची नव्हती तर त्यातल रिकामपण एका व्यापक अर्थातून, व्यापक दृष्टीकोनातुन मांडायच होत. अतिथी संपादक म्हणुन डॉ. नितीन थोरवे यांनी योग्य न्याय दिला आहे असं मला वाटत. प्रल्हाद दुधाळ यांच्या फ्रेम या कवितेमुळे या अंकाला एक वेगळाच अर्थ मिळाला आहे.



**शशिकांत रणवरे**
ठाणे

# राहायचे किती असे

राहायचे किती असे
पहायचे किती असे
जगुन घ्या हसुन घ्या
जगायचे किती असे

अडथळे अडथळे
चुकविले हुकविले
कवेत घ्या एकदा
अडथळे किती असे

संमंध झपाटती पुन्हा
कबंध मातले नवे
द्या वक्रवाकुल्या
समंधही किती असे

तमात लोप पावता
उजाडते पुन्हा नवे
चला उठा पुर्व व्हा
उगे रवी किती असे....

प्राजक्त देशमुख
नाशिक

# खळगी

माथ्यावर सुर्य घेउन
दिवस सरतो आणि रात्र
गारठलेला देह चिमण्यांच्या ऊबेसाठी
पदरातल्या ठीगळांसाठी
पोटांच्या खळग्यांसाठी
कोणी तरी ओरबडत असतो स्वतःला
दिवस रात्र!!!
आणि टोकांच्या घावांनी आपल्या वेदना
मांडायच्या तरी कुठे ?
त्या फक्त झेलायच्या !
आणि तो झेलतोही आभाळकडे पाहत
दयेसाठी ? नाही
धिक्कार म्हणुन!
ते घाव
मात्र कधी झरतात कधी मरतात
पण कधी भरत नाहीत
भरतात ती डोळयाची खळगी
पण पोटातली आग विझतेय कुठे ?
ती भडकत जाते
खिसे चाचपडत अखेर तो
जवळच्या टाकीकडे वळतो
आणि ओततो घशात पोटभर पाणी !!!
कदाचित आग विझेल
कदाचित विझणार नाय
पण इतकी कशी महाग झाली ?
एक कटिंग चाय !!

सुधीर मुळीक
मुंबई

# फ्रेम

माझ्या दिवास्वप्नातले घर
घरचा भला मोठा दिवाणखाना
दिवाणखान्याच्या भिंतीवर
लावली आहे एक आकर्षक पण रिकामी फ्रेम
या फ्रेम मधे काय लावू बरं?
लावावा का फोटो स्वतंत्र भारतासाठी
शहीद झालेल्या
एखाद्या नरविराचा?
का लावावा आजच्या सत्ताधिशाचा?
पण नकोच !
लावावा तेथे फोटो स्वतंत्र भारतात
आत्महत्या कराव्या लागलेल्या
एका कर्जबाजारी बळीराजाचा?
पण त्याने काय होणार?
त्यापेक्षा ही फ्रेम रिकामीच ठेवावी
कधीतरी त्यात लावता येईल फोटो
स्त्री-भ्रुणहत्येत सामील एखाद्या पांढरपेशा
नराधमाचा! अथवा
माणुसकीला काळीमा फासुन
अगतिक माणसाच्या
अवयवांची तस्करी करणाऱ्या
कुरकर्म्यांचा
या फ्रेम मधे रंग भरीन म्हणतो
गद्दार देशद्रोहींच्या रक्ताचा
पण मी एक सामान्य  नागरिक
प्रत्यक्षात फार तर फोटो लाविन तेथे
त्या निर्मिकाचा आणि करेन पुजा मनोभावे
देवा सर्वांना चांगली बुध्दी दे
मला मात्र सुखात ठेव !!!!

प्रल्हाद दुधाळ

# लिहितो उगाच आहे

कळले मला कधी ना
लिहितो उगाच आहे
शब्दात अर्थ माझ्या
दिसतो उगाच आहे

मी मेघ भारलेला
फ़िरतो उगाच आहे
माझ्यातल्या जलाने
भिजतो उगाच आहे

बरसलो इथे-तिथे मी
उरलो उगाच आहे
गर्भात पोकळीच्या
जगतो उगाच आहे

संन्यस्त मी स्वतःला
म्हणतो उगाच आहे
ह्या मोगरा उशाशी
कण्हतो उगाच आहे


दुनियेत मी स्वतःच्या
रमतो उगाच आहे
निःश्प्राण प्रेत माझे
सजवितो उगाच आहे

**सॅम - महेंद्र कुलकर्णी**
कल्याण



मी मराठी
जय महाराष्ट्र
ह्या अंकात वाचा,
मी मराठी


नाते चंद्राचे
मध्यान रात्री
निशाब्द काळजाला
चंद्र येतो भेटीला......
चंद्र असतो साक्षीला.......




शून्य
ई-साहित्य प्रतिष्ठान
वर्ष तिसरे, अंक ५,
३१ जानेवारी २०११


चाय






Turn off Life ?
Stand By
Turn Off
Restart
Cancel


I ♥ India


100

# मेरुमणी ओलांडताना......

एक साधं सरळ रेषेत चाललेलं माझं आयुष्य. कधी कसं बदललं ते कळलच नाही. रोज़ मी मलाच जगायचे, मलाच पारखायचे पण जेव्हा “नेटाक्षरी” सोबत प्रवास सुरु झाला तेव्हा ख-या अर्थाने स्वतःला ओळखू लागले जगु लागले. माझ्या प्रत्येक अंकातून खुप व्यक्ती मला भेटल्या... त्यांच्या कवितांमधून, भावनांतुन, शब्दातुन मी रोज़ नव्याने आयुष्य जगले...

नेटाक्षरी करता करता कधी मीरेची एकतारी अनुभवली तर कधी प्रेमाचे हल्के फुल्के रंग... कधी “out of the box” जाऊन “काहीतरी वेगळं” करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तर कधी “senior citizens” च्या “young & restless” पणात अगदी मंत्रमुग्ध झाले....

जुलै २००९ ते आतापर्यंतच्या ह्या सुंदर आणि अविस्मरणीय प्रवासात खुप भावना जगले आणि एक “माणुस” म्हणून रोज़ थोडी थोडी घडत गेले. कधी स्त्रीच्या विविध सुंदर रुपांतून नेटाक्षरी सजली तर कधी तिने नवीन वर्षाचे नवीन संकल्प सोडले...कधी मैत्रीच्या नाजूक धाग्यांतून नेटाक्षरी ची विण अधिकाधिक घट्ट होत गेली तर कधी “आभाळाला”च तिने गवसणी घातली...कधी मोजक्या शब्दांत “कर्ण” सांगून गेली तर कधी “नवलाई नाविन्याची” म्हणत नवनवीन कवींना प्रोत्साहन सुद्धा दिलं...



भारती सरमळकर
मुंबई

नेटाक्षरी
अंक क्र.
१००

ऑनलाईन वाचक
----
८४४००

नेटाक्षरी माझ्या हातून घडत होती आणि कळत नकळत मी नेटाक्षरीतून...एक एक अंक म्हणजे मंतरल्या जपमाळेचा एक एक मणी ओढल्यासारखं वाटतं आणि जपमाळेचे एक आवर्तन पुर्ण झालं की मेरुमणी ओलांडताना नम्रतेने ती माळ मस्तकी ठेवल्याचा भास होतो.

असं काहीसं नातं आहे माझं आणि नेटाक्षरीचं... एकमेकींना घडवणारं आणि घडणारं...आज तिला १०० व्या अंका पर्यंत पोहचलेली पाहून खरं तर मलाही मोठं झाल्यासारख वाटतय... कारण नेटाक्षरी न कधी एकटी वाढली ना घडली.... तिने स्वतः सोबत आम्हा सर्वांना वाढवलं घडवलं आणि आमच्या ८०००० वाचकांना तिच्या काव्यातुन आणि रुपातुन अपरिमित अगणित आनंद दिला.

इंटरनेटवर मराठी कवितांना हक्काचं अस स्वतःच व्यासपीठ कुणी दिलं असेल तर ते "नेटाक्षरी" ने आणि मी ह्याचा एक अंश आहे ह्याचा मला अभिमान आहे गर्व आहे...

तिची आणि माझी सोबत हि सदैव अशीच राहो...कारण अजून आम्हा "दोघींना" बरंच मोठं व्हायचंय, घडायचंय... तेव्हा मराठी भाषेतील कवितांच्या ह्या एकमेव ई-साप्ताहिकाला तुमचं प्रेम, प्रोत्साहन आणि प्रतिसाद असाच उदंड मिळो हिच श्री चरणी प्रार्थना !

"नेटाक्षरी" च्या सर्व रसिक वाचकांना आणि आमच्या अविरत अथक काम करणा-या टिमला खुप खुप शुभेच्छा !!!

तप्त रणरणत्या उन्हात  
सावलीही सोडुन गेली ...  
हट्ट आहे चालण्याचा  
काफिला येईल पाठी ...



**भारती सरमळकर**  
**मुंबई**

# पुत्रवियोग

पिंपळाच्या पानाला
स्वतःच्या खांद्यावर घेऊन
सैरभैर वाहणारा वारा
त्याचे लाड पुरवत
त्याला जपत
जमिनीचा स्पर्शदेखील न होवू देता
घेवून जात होता
अलगद, हळूवार
उंच आणि उंच आणि उंच....
तेव्हा सतराव्या मजल्यावरल्या
'त्या' खुल्या हातांनी
पानाला धरलं चिमटीत,
आणि
बंद केलं
पुस्तकाच्या दोन पानांत
तेव्हा वारा वहायचा थांबला
.
.
.
कायमचा...

शंतनू चंद्रात्रे
नाशिक

# उपकार फार देवा

राहू कसा उपाशी ? उपकार फार देवा
पोटात टाकलेल्या चिंता हजार देवा

आकाश तारकांचे लिहीले जरी नशिबी
केव्हा तुला कळाला माझा नकार देवा

लावायला पणाला पत्नी असे न भाऊ
खेळू नव्या जगाशी कुठला जुग़ार देवा

कुठल्या गुहेत गेलो ना मंदिरात गेलो
गेलास काळजाच्या आरपार देवा

पाहून आज मजला ना हासते जराशी
माझा कुठे तिच्याशी झाला करार देवा

आपापसात लढले भगवे निळे नि हिरवे
रंगात लाल होता त्यांचा थरार देवा

**खेळाडू**
लातूर

# तू

मी कितीही विखुरलो
छिन्न भिन्न जाहलो
तू मला गोळा करतेस
लहान मुलाने चित्रकोडे
एकत्र करावे तसे !

मी इतुका अवघडलेला
तू मला सहज मोकळा करतेस !
सहजपणे सगळे कसे जमते तुला हे?

मी नेहमीच फाटलेल्या
वस्त्रा सारखा अलग थलग
तू सगळा मला जोडुन
आईच्या मायेने,
माझ्या फाटलेल्या वस्त्रांची
गोधडी करतेस
उबदार, आश्वस्त
सहजपणे सगळे कसे जमते तुला हे?

थंडी इतुकी कडाक्याची
झाडांचे ही खराटे होतात
गिळुनी सगळा उबदारपणा
रात्रीही गारठतात
तू मात्र मला बाहुपाशात घेऊन
विश्वाची उब माझ्या शरीरात भरतेस !
सहजपणे सगळे कसे जमते तुला हे?

तुझ्या स्तनातून
वाहणारे दूध नाकारुन
तू तुझ्या विसर्ग झालेल्या गर्भाला
विसरलीस माझ्यासाठी !
सहजपणे सगळे कसे जमते तुला हे?

मी मात्र
पुन्हा पुन्हा उबीसाठी
तुझ्या शरीराला झोंबतो
अन
तू तरीही माझ्यासाठी मोकळी होतेस
हरेक रात्रीस !
सहजपणे सगळे कसे जमते तुला हे?

**पुनःश्च हरीओम**
(विजयकुमार)
मुंबई

# सांत्वन

काल माझ्या सांत्वनाला कोण तो येवून गेला
एक माझा हुंदका रे.. एक तो देऊन गेला. . !!

हा कुणाचा हात आणि ही कुणाची आसवे रे
हाक मारु मी कशी. . आवाजही घेऊन गेला. . !!

का घरे वाहुन गेली कालच्या त्या पावसाने
का नदिचा काठ माझा कोरडा ठेऊन गेला. . !!

पांगळी माझी व्यथा का आंधळ्या गावास सांगु?
मी न केली आर्जवे तो का पुन्हा येवून गेला. . !!

सावळी माझी कहाणी, सावळा माझा मुरारी
सावळेसे सूर माझे सावळा घेऊन गेला. . !!

**ममता रियाज़**
पुणे

# मीरा

काळजातल्या एकतारीला
सुचला एकच सूर..।
डोळ्यांमधल्या यमुनेलाही
नकळत आला पूर..।
ती हाक मारते,
साद मागते,
अन, वदते
कान्हा-कान्हा. . .
तिला तिचा तो
"कृष्ण सावळा"
कुणीतरी आणुनी द्या ना ।।

त्या श्यामनिळ्याच्या
बासरीभवती,
जमले जरी गोकुळ..।
परी कुणा कळेना
तो सजवित आहे,
तिच्या दोह्याची ओळ..।
तिने श्वासांची
'जपमाळ' सोडुनी
त्यातही ओवला "कान्हा"
तिला तिचा तो,
"कृष्ण सावळा"
कुणीतरी आणुनी द्या ना ।।

तीने जहर लावले
त्याच्यासाठी,
अलगद रे, ओठास..।
"त्या"च क्षणाला,
कृष्ण म्हणाला,
यमुनेच्या काठास. .
"या तुझ्या कुशीतुन
तिच्याच साठी
"कृष्ण" येउ दे पुन्हा. .!!"
अरे!, तिला तिचा तो,
"कृष्ण सावळा"
कुणीतरी आणुनी द्या ना ।।

ती मागत नाही
कृष्ण तुम्हाला,
वा कृष्णाची मुर्ती. . .।
ती सांगत राही
कृष्ण तुम्हाला,
अन, कृष्णाची भक्ती. . ।
ती पवित्रता,
ते प्रेम निर्मळ,
तुमच्याही ह्दयी जाणा
त्या मीरेला
केव्हाच मिळाला "ति"चा
"कृष्ण-सावळा", "कान्हा"

**सचिन काकडे**
मुंबई

# फ्युचर

तुला कवळायचं खुप मनात होतं
म्हणून वाढवत गेलो
हातांचा आवाका
तर तू अजून प्रसरण होत गेलास
.
.
तुला गाठणं तर दूरच
तुला नजरेत साठवणंही दुरापास्त होत गेलं
तुझी उंची वाढतेच आहे
वाढतेच आहे
.
.
पण गाठेन तुला एक दिवस
मी असेन नसेन
पण माझा एखादा DNA
तुला नक्की समेटेल
गुंडाळेल
चिमटीत धरेल
नाचवेल
बोटांवर नाचवेल

नाम गुम जायेगा
ठाणे




तुझा
दोष
नाही

कवितांच्या कविता



ई-साहित्य प्रतिष्ठान




अरे वाह !
मराठी कवितांच चक्क
ई-साप्ताहिक


अक्षरमित्रांची 'नेटगिरी'
नेटवर मराठी कवितांचे 'मॅगेझिन!
'ऑर्कुट'वर भेटतात ५० हजार मराठी काव्यप्रेमी
मोबाईलवरून ऐकवा कविता
Weekend
महाराष्ट्र टाइम्स
ऐसी 'नेटाक्षरी' मेळवीन
बालदिनी 'बाल नेटाक्षरी' अंकाची भेट
नवोदित कवींचं
'सर्वात्मका शिवसुंदरा'
UTH TUBE
कवितेच्या 'नेटा' जावे!



# वाचकांचे अभिप्राय

वाचकांचे अभिप्राय

esahity@gmail.com
साहित्य प्रतिष्ठान

From: **Priti G.** <priti106@yahoo.com>
Date: Thu, Mar 25, 2010 at 3:56 PM
Subject: Subscription for ank
To: netaksharee@gmail.com

Hi,

I am priti garud, right now in kazakhstan. one of my friend fwded me "vinda".
i really liked it and would love to receive "pudhil anek ank" Tevha please mala aplya subscription list madhe add kara. ani plz apli website kalava.

Priti

---

From: Shridhar.Ingavale@hella.com to me

Hi,
i read ur pdf document....I quit......its really amazing doc...... and it will really help to bullish people who sucide...... I think ur artical change the mind of the people get frusterated and......one thing i want to mention here plz produce this artical in theTarunai (Sakal), Young Bigread (Pudhari), O2 (Lokamat).....If ur permission i will try to reach this doc to many people....
ok replyyyyy

Thanks and Regards
Shridhar Ingavale

Hella India Electronics Pvt. Ltd.
2nd & 3rd Floor,"NANO SPACE",
Baner, Pune 411 045.INDIA
Cell :+91 9975612272

---

**From: Jeevan Talegaonkar <jeevan.talegaonkar@gmail.com>**
Date: Mon, Mar 22, 2010 at 2:55 PM
Subject: Hi
To: netaksharee@gmail.com

Hi
Keep sending me quality literature, I will pass on to Maharashtrians in Delhi/ NCR.
--
Thanks and BR...Jeevan Talegaonkar, Maharsahtra Mandal Gurgaon
+919971699027

वाचकांचे अभिप्राय

netaksharee@gmail.com

साहित्य प्रतिष्ठान

**From: K G <kgore2001@yahoo.com>**
Date: Mon, Jul 27, 2009 at 5:24 PM
Subject: Re: Marathi E-Magazine - Net@ksharee - Issue 37
To: netaksharee esahitya <netaksharee@gmail.com>, Swapna Kolhe <only.swapna@gmail.com>

Dear Swapna Kolhe, Sweta Deshmukh and the Team,

First of all thank so much you for sending me this Marathi E-Magazine - net@ksharee - Issue 37 in the email just couple minutes back. I have hurridly glanced the issue and just wanted to convery you my thoughts, my two cents...!

Great! I would read the issue in details later on but on the onset, I am impressed by the quality and fineness of the work. Great teamwork! Pl. keep it up!!

Another thing I noted that I know none of you in your team and how come you got my email address? Nothing wrong, you did a great favor infact with this treat, but just curious as to know the source since this electronic tools have made such a great impact in our lives. Having come to us the US on the World Fellowship and Rotary Foundation Fellowships 15-16 years ago, myself and my wife, Anjali have settled here here with our two lovely daughters.

Although we visit India regularly, still these kinds of literary treats are rare! So, please keep on sending them as well as such other goodies.

Once againCONGRATULATIONS TO YOUR TEAM! GREAT JOB! Pl. keep in touch!

Thanks !

KISHOR GORE
4 Richmond Court
Princeton Junctiuon, NJ 08550
kgore2001@yahoo.com
609-721-2308 C

## वाचकांचे अभिप्राय

esahitya@gmail.com
साहित्य प्रतिष्ठान

**From: Arun Kirloskar <arunkirloskar@vsnl.net>**
Date: 2010/3/27
Subject: Re: मनापासून धन्यवाद
To: netaksharee esahitya <netaksharee@gmail.com>

what can i say? unfortunately i am no computer geek at 75! or else i too wd type marathi. i know there are enough ways now available, but there are limits to what an old dog can learn.any way, do let me know if n when u need my help. cheers.

---

**From: CO COIBR Recon Dept., Wagh P. K., Sr. Manager** <pandharinath.wagh@mahabank.co.in>
Date: 2011/5/3
Subject: नेटाक्षरी : कवितेच्या कविता
To: netaksharee@gmail.com

**Dear Sir / madam,**
I am very happy to read such a marvelous ideas in Marathi-netaksharee. Novelty in contents with unexpected theme.

Wish you all the best.
Yours faithfully,
Pandharinath Wagh
Pune.

---

**From: SHRI USR <shriniwas19102005@gmail.com>**
Date: Mon, May 2, 2011 at 12:19 PM
Subject: esahitya
To: netaksharee@gmail.com

dear sir,
i have recieved couple of your esahitya - publications
and prematach padlo.

do send me in your future publications at this email id.

thanks n regards,
shri

netaksharee@gmail.com
साहित्य प्रतिष्ठान

**From: hemant sant <drhemantsant@yahoo.co.in>**
Date: Thu, Apr 23, 2009 at 3:30 PM
Subject: Congratulations from one of the marathis of baroda
To: netaksharee@gmail.com

God bless those who strive to make us all happy and re charge our and our children s'  love for their mother tongue..nothing better than humour..to teach them marathi!! enlist me in..mala marathi type karata yet nahee.
pardon me

Dr Hemant A. Sant MS
Sant Surgical Hospital,
Sainath towers,
GPO road,Kharivav,Raopura,Vadodara.390001.
Tel.0265-2424901.Mob.9825038201.(R)2488401.
my Blogs page-http://santhemant.sulekha.com

---

**From: <gunjikar.prasad@indiatimes.com>**
Date: Fri, May 15, 2009 at 5:09 PM
Subject: Thanks for new Inventions through net....
To: netaksharee@gmail.com
Cc: Mayur Suryavanshi <mayursuryawanshi1@gmail.com>

Dear NETAKSHAREE,

A lots of thanks for keeping MARATHI Poems alive.I am very glad to see, read and enjoy the Marathi Poems through the Net. Its really a good IDEA......Sir JI.

I am enjoying a lot to read the each articles send by one of my Friend Mayur. He Introduced about NETAKSHAREE to mee. I am very glad to See.

ALL THE BEST for next coming editions.... I wish, Netakshree will continue forever till the end of Planet.

Best of Luck.

Regards,
Prasad Gunjikar
Help Somebody.....SOMEBODY HELP U!


ही मंडळी आहेत तरी कोण ?

टीम नेटाक्षरी

एक ओळख

netakshare@gmail.com

साहित्य प्रतिष्ठान

# ही मंडळी आहेत तरी कोण ?

कुतुहल तर सर्वांनाच असणार. ही मंडळी कोण ? कुठल्या पक्षाची ? फ़ंड कुठून येतात ? यांना पगार मिळतो ? मानधन तरी ? किंवा काही इतर कमाई. डोनेशन्स मिळतात ? यांच्या ‘मागे’ कोण स्पॉन्सर आहे ? यांचा फ़ायनल उद्देश काय ?

ही सगळी मुलं ओर्कुटवर भेटली. इतर लोक ओर्कुट किंवा फ़ेसबुकचा वापर गप्पा हाणायला करतात. यांनी मराठी कविता आणि कथा यांच्यासाठी केला. सोनाली, रेणू या शिक्षण क्षेत्रातल्या. नोकरी संभाळून हे करत असतात. रेणू तर अमेरिकेतून काम करायची. नाशिकची स्वप्ना व्यवसायाने आय टी त. घर आणि नोकरी करून वर शिक्षणही चालू. त्यात मराठी साहित्याचा सखोल अभ्यास करून कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा मानाचा साहित्य भूषण पुरस्कार मिळवला. पण नेटाक्षरी हे व्रत. त्यामुळे इस्पितळात स्वत: गंभीर आजारी असतानाही लॅपटॉपवर अंक बनवणं चालूच होतं. भारती सुद्धा त्यातलीच. नोकरी आणि MBA चं शिक्षण चालू असताना रात्र रात्र जागून नेटाक्षरीचे अंक बनवत असते. पण यातल्या कशाचीच सबब न सांगता अंक वेळेवरच आणि उत्कृष्ट काढले. सुरूचीने सध्या PhD च्या अभ्यासासाठी ब्रेक घेतला आहे खरा, पण जेव्हा कमबॅक करील तेव्हा पहातच रहाल. सारंग हा कायदेतज्ञ. एक पाय भारतात तर दुसरा जगाच्या कुठल्यातरी कोनात. पण मन सदा कवितेत.

**टीम नेटाक्षरी**
एक ओळख

www.esahity.com
साहित्य प्रतिष्ठान

शशिकांत आणि सचिन आय टी क्षेत्रातले. नवनवीन कल्पनांची खाण जणू. अनंत व्यक्तिगत अडचणींवर मात करून सचिन उत्तमोत्तम अंक द्यायला झटत असतो. नेटाक्षरीची मूळ कल्पना राबवणारा आनंद . सध्या MBA करत आहे तो ही नेटाक्षरीचा हा कारभार सांभाळून.

ही सर्व मंडळी स्वतःचेच पैसे खर्चून हे काम करतात. ना फ़ंड. ना स्पॉन्सर. ना कुठला राजकीय पक्ष. पण हा टाईम पास नाही. वेळ जात नाही म्हणून घेतलेलं हे काम नाही. गाजराची पुंगीही नाही. एक पक्की दिशा आणि ठाम ध्येय ठेवून ही मंडळी चालताहेत. इंटरनेटचा वापर करून मराठीला तिच्या खऱ्या योग्यतेला न्यायचंय. त्यामुळे आम्ही गंमतीने चर्चा करतो की तुम्हा मंडळींची लग्नं झाल्यावर तुम्ही हे चालू ठेवणार ना ? आणि त्यावर यांचं उत्तर असतं... आम्ही तर करूच, पण आमचे नवरे आणि बायकांनाही यात सामिल करून घेऊ. यातली गंमत सोडा, पण एक नक्की. अशा डेडीकेटेड मंडळींच्या हातात असलेली ही चळवळ म्हणजे लंबी रेसका घोडा आहे. लष्करातल्या शहीदांच्या टाळूवरचं लोणी खाण्याच्या या जमान्यात घरचं खाऊन लष्करच्या भाकऱ्या बडवणारी एक भक्कम सेना उभी रहाते आहे. चारशे कवी लेखक. लाखभर वाचक आणि सुमारे पन्नास जणांची ही टीम. सर्वांची नांवंही जगासमोर येत नाहीत. अशी पडद्यामागे कामं करणारी अनेक मुलं आहेत.

टीम नेटाक्षरी
एक ओळख

# अंक बनतो कसा ?

संपादक मंडळ जरी मोठं असलं तरी एक अंक एकच संपादक बनवतो. अंकाची थीम दोन महिने आधी ठरते. मग त्या अंकाचा संपादक कामाला लागतो. आधी त्या थीमशी जुळले गेलेले एक अतिथी संपादक मिळवण्याचे काम असते. मग त्या अतिथी संपादकासह कवितांची शोधाशोध आणि निवड. मग त्या कविता एका वेगळ्या फॅांट मध्ये टाईप करणं. ते अशासाठी की कुणी यातली एखादी कविता कॅापी पेस्ट करून स्वतःच्या नांवावर खपवायचा प्रयत्न करू नये. मग सजावट. चित्रं शोधणं. मांडणी, मुखपृष्ठ असं करून तयार झालेला अंक संपादक मंडळासमोर ठेवला जातो. संपादक मंडळ त्यावर शिक्कामोर्तब करतं. तेव्हा हा अंक ८०००० वाचकांसमोर जातो.

येणारी वीस पंचवीस वर्षं नेटाक्षरीची पकड जनमानसावर अधिकाधीक जमत जाणार आहे. ही गाजराची पुंगी नाही. वेळेवर अंक निघावा म्हणून रात्र रात्र जाग़णारी भारती, आनंद, स्वप्ना, सचिन, शशिकांत, सोनाली यांच्यावर लाखो वाचकांची भिस्त आहे. तर पाठीशी अमृता ढगे, रवी भांगे, आल्हाद महाबळ, मंजिरी दाभोळकर अशा चित्रकार आणि छायाचित्रकारांची फ़ौज आहे. उणे पूरे चारशे कवी आणि लेखक आहेत. दर महिन्याला होणारे कार्यक्रम, मैफ़ली आहेत. पाडगांवकर, नायगांवकर, प्रवीण दवणे अशांचं मार्गदर्शन आहे. मागील पिढ्यांचं दिग्दर्शन आणि येणाऱ्या पिढ्यांच्या सहभागाने ही चळवळ उत्तरोत्तर अधिक बलवान होतच राहील असा विश्वास आहे.

**टीम नेटाक्षरी**

www.esahity.com
साहित्य प्रतिष्ठान

अंक क्र. १००

नेटाक्षरी

www.esahity.com

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रतिष्ठानचा ध्यास **'नेटाक्षरी'** जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय. आमच्या रसिक वाचकांच्या ह्याच उत्स्फुर्त प्रतिसादामुळे नेटाक्षरी आज **नाबाद १००** चा पल्ला गाठत आहे. नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ८०००० हून अधिक मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणा-यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा ही इच्छा. आपल्या सारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहचवण्याचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

**ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके**

**ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी**

**प्रसिद्ध झालेली ई-पुस्तके**

**टल्लीची शाळा, मकरंदच्या त्रिवेण्या, ग्रेव्हयार्ड लिटरेचर, चार क्षण,**
**तो आणि ती, प्रियेचे अभंग, देशी दारुचे दुकान-3D, ई-शाळा,**
**तो, मी आणि सिगरेट, मोरया, लोकल गोष्टी**
**मीरा (मराठी अनुवाद), ओथंब**
**सावळ्या मुलीची गाणी, सईची वही, अहं ब्रह्मास्मि**

---

वरील ई-बुक्स विनामूल्य मिळण्यासाठी
तसेच सूचना ,अभिप्राय ,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**esahity@gmail.com**

नेटाक्षरीचा हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी व
सूचना ,अभिप्राय ,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**netaksharee@gmail.com**

आता ई-साहित्यची सर्व ई-प्रकाशन उपलब्ध आहेत सी डी मध्ये

**संपर्क करा - ९८६९६७४८२०**

ई साहित्य प्रतिष्ठान

॥ महाराष्ट्री जन्मास आल्याप्रमाणे
महादिव्य हातुन काही घडो ॥